रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३३९ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १६ मे २०२४

किंमत ४ ₹

## न्यूज क्लिकच्या संपादकांची अटक अवैध

**नवी दिल्ली :** न्यूज क्लिकचे संपादक प्रबीर पुरकायस्थ यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने त्यांची तातडीने सुटका करण्याचे आदेश दिले आहेत. याप्रकरणी न्या. बी.आर. गवई आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठाने निर्णय दिला आहे. प्रबीर पुरकायस्थ यांच्यावर काही दिवसांपूर्वी यूपीए अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर त्यांना दिल्ली पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. पोलिसांनी केलेल्या कारवाईला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर बुधवारी सुनावणी झाली.

## सीएएअंतर्गत नागरिकत्व प्रदान

**नवी दिल्ली :** केंद्रानं नियम अधिसूचित केल्यानंतर सुमारे दोन महिन्यांनंतर नागरिकत्व (सुधारणा) कायदा (सीएए) अंतर्गत नागरिकत्व प्रमाणपत्रांचा पहिला संच बुधवारी १४ लोकांना जारी करण्यात आला. पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमध्ये धार्मिक कारणास्तव छळ झालेल्या अल्पसंख्याकांना हिंदुस्थानात नागरिकत्व मिळू शकते. बुधवारी १४ लोकांना त्यांच्या अर्जांवर ऑनलाइन प्रक्रिया केल्यानंतर नागरिकत्व प्रमाणपत्रे मिळाले. केंद्रीय गृहसचिव अजय कुमार भल्ला यांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

# उमटे गाळमुक्त होणार

### शेतकरी कामगार पक्षाच्या पाठपुराव्याला यश

### सीएफटीआयला गाळ काढण्याची परवानगी



। रायगड । खास प्रतिनिधी ।

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी सेंटर फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया (सीएफटीआय) या सामाजिक संस्थेला परवानगी दिली आहे. त्यामुळे आता धरणातील गाळ काढून अलिबाग तालुक्यातील तब्बल ४४ गावांना शुध्द पाण्याचा पुरवठा होण्यास मदत मिळणार आहे. शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी पिण्याच्या पाण्यासाठी आक्रमक भूमिका घेत मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांची २९ एप्रिल २०२४ रोजी भेट घेतली होती. नागरिकांना शुध्द पाणी द्या, शासनामार्फत धरणातील गाळ काढा अन्यथा आम्हाला तो गाळ काढण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी चित्रलेखा पाटील यांनी केली होती. त्यांच्या मागणीला आज यश आले आहे.

धरणाची साठवण क्षमता ८७ दक्षलक्ष घनफूट

पाण्याची शेवटची पातळी ४० मीटर

धरणाची उंची ५६.४० मीटर

गाळामुळे साठवण क्षमता ३० द.ल.घ.फू. कमी

### श्रमदानासाठी आवाहन

गाळ काढण्यासाठी परवानगी मिळावी यासाठी गेल्या महिनाभरापासून शेकापमार्फत पाठपुरावा करण्यात येत होता. अखेर त्याला यश आले आहे. संबंधित संस्थेमार्फत लवकरच गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. पोकलेन, जेसीबी, ट्रक यासह अन्य यंत्रसामुग्री प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील, नृपाल पाटील उपलब्ध करुन देणार आहेत. परिसरातील ४४ गावांनी श्रमदान करण्यासाठी पुढाकार घ्यावा, तसेच आवश्यक असणारी यंत्रसामुग्री उपलब्ध करुन श्रमदान करावे, असे आवाहन उमटे धरण संघर्ष ग्रुपने केली आहे.

उमटे धरणाच्या पाण्यावर अलिबाग तालुक्यातील तब्बल ४४ गाव आणि ३३ आदिवासी वाड्यांतील जनता अवलंबून आहे. उमटे धरणाची निर्मिती १९७८ साली करण्यात आली. त्यानंतर १९९५ साली हे धरण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून रायगड जिल्हा परिषदेला हस्तांतरीत झाले. त्यामुळे धरणाची जबाबदारी रायगड जिल्हा परिषदेवर आहे. धरणाची साठवण क्षमता ८७ दशलक्ष घनफूट आहे. पाण्याची शेवटची पातळी ४० मीटर, धरणाची उंची ५६.४० मीटर आहे. सद्यः स्थितीत मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाण्याची साठवण क्षमता सुमारे ३० दशलक्ष घनफूट आहे.



उमटे धरणातून अशुद्ध पाण्याचा पुरवठा होत होता. आता गाळ काढण्याला परवानगी मिळाली आहे. लवकरच कामाला सुरुवात होणार आहे. पावसाळ्यानंतरही गाळ काढण्यासाठी आम्ही प्रयत्न करु. ग्रामस्थांना कायमस्वरुपी शुद्ध पाणी देण्याचा आमचा प्रयत्न राहील. याबाबत प्रशासन, उमटे धरण परिसरातील ग्रामस्थ, उमटे धरण संघर्ष ग्रुप, ॲड. राकेश पाटील, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यासह अन्य सर्वांचे आभार व्यक्त करते.

– चित्रलेखा पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख



शेकाप नेहमीच सामाजिक उपक्रमात पुढे राहिला आहे. उमटे धरणातील गाळ काढण्याचा प्रश्न बऱ्याच कालावधीपासून प्रशासनामार्फत रेंगाळला होता. त्यामुळे बहुसंख्य नागरिकांना अशुद्ध पाणी प्यावे लागत आहे. गाळ काढण्यासाठी मी पोकलेन, जेसीबी यासह अन्य आवश्यक साहित्य देत आहे. तालुक्यातील अन्य व्यावसायिकांनीदेखील या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे.

– प्रशांत नाईक, माजी नगराध्यक्ष, अलिबाग

उमटे धरणातील गाळ कित्येक वर्षे काढण्यात आला नव्हता. त्यामुळे तालुक्यातील ४४ गावे आणि ३३ आदिवासीवाड्यांवरील नागरिकांना दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे. याबाबत प्रशासनाकडे सातत्याने प्रश्न मांडण्यात आला. मात्र, प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे नागरिकांना अशुद्ध पाण्याचा पुरवठा होत असून, महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, तसेच येथील पर्यटन व्यवसायावरदेखील विपरीत परिणाम होत असल्याने यातून मार्ग काढावा, अशी विनंती उमटे धरण परिसरातील स्थानिकांनी केली होती.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड आणि कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांनी सेंटर फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया (सीएफटीआय), दिल्ली या सामाजिक संस्थेला त्यांच्या सीएसआर फंडातून १४ मे रोजीच्या पत्रान्वये उमटे धरणातील गाळ काढण्याची परवानगी दिली आहे.

गेल्या काही वर्षांपासून प्रशासनाने याबाबत कानाडोळा केला होता. त्यामुळे जनतेला अशुद्ध पाणी प्यावे लागत होते. आता मात्र शेकापने केलेल्या पाठपुराव्यामुळे गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. शेकापच्या जनतेप्रती असलेल्या आत्मीयतेबाबत आम्ही अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील, नृपाल पाटील यांचे आभार व्यक्त करतो, असे ॲड. राकेश पाटील, ॲड. कौस्तुभ पुनकर यांनी सांगितले.

# धावरी नदीत बुडून चिमुकल्यांचा करुण अंत

। पाताळगंगा । वार्ताहर ।

मोरबे धरणाची उपनदी असलेल्या धावरी नदीत दोन चिमुरड्यांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला असून, संपूर्ण जांभिवली गावात दुःखाची सावट पसरली आहे. बुधवारी (दि. १५) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास आराध्या संजय गावडे (५ वर्षे) व आरव विजय गावडे (५ वर्षे) या दोन सख्ख्या चुलत भावाबहिणीचा धावरी नदीत बुडून मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेबाबत नातेवाईक, मित्र परिवार, ग्रामस्थांमधून हळहळ व्यक्त होत आहे.

सकाळच्या सुमारास हे दोन चिमुकले आई आणि काकीबरोबर नेहमीप्रमाणे नदीवर कपडे धुण्यास गेले होते. आई आणि काकी कपडे धूत असताना या दोघांनी पाण्यात आंघोळ केली. कपडे धुवून झाल्यावर आई, काकी घरी आले. त्यांच्याबरोबर ती मुलेसुद्धा आली. परंतु, काही वेळाने ते घरी किंवा शेजारी अथवा कुठे खेळत नसल्याचे दिसल्यावर शोध सुरु झाला. त्यावेळी ती पुन्हा नदीवर गेली का, ही शंका आल्याने पाहणी केली असता आराध्या ही पाण्यावर तरंगत असताना दिसली. तर, आरव पाण्यात चिखलात अडकल्याचे निदर्शनास आले. दोघांनाही चौक येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

ही दुर्दैवी घटना समजताच परिसरातील नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली. दरम्यान, या घटनेचा चौकचे सपोनि युवराज सूर्यवंशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करीत आहेत.



चिमुकल्यांचे मृतदेह बाहेर काढताना ग्रामस्थांनीही घटनास्थळी गर्दी केली होती. चिमुकल्यांच्या या दुर्दैवी मृत्यूने कुटुंबियांचा आक्रोश काळीज पिळवटून टाकणारा होता. शोकाकूल वातावरणात या मुलांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. जांभिवली गाव शोकसागरात बुडाले असून, सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# भाजीचा टेम्पो उलटून एक ठार, तीन जखमी



। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर नागाव-विन्हेरे रस्त्यावर काटेतळीनजीक भाजीवाहतूक करणारा टेम्पो उलटून एकाचा मृत्यू, तर तीनजण जखमी झाल्याची घटना मंगळवारी (दि. १४) मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास घडली आहे.

पोलादपूर पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी श्रीकांत विलास पिसाळ (रा. ओझर्डे ता.वाई जि.सातारा) हा आपल्या ताब्यातील अशोक लेलँड टेम्पो (क्रमांक एम एच ११डी डी ९७६२) यामध्ये वाई येथून भाजीपाला भरून चार प्रवासी बसवून पोलादपूर बाजूकडून काटेतळी मार्गे विन्हेरे रस्त्याकडे जाताना काटेतळी हद्दीत आला असताना त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटून अतिवेगाने,

•➤ पान ५ वर

## घाटकोपर : अद्याप बचावकार्य सुरूच

। मुंबई । वृत्तसंस्था ।

घाटकोपरमध्ये होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला होता. तब्बल ४६ तास उलटल्यानंतरही याठिकाणी अद्याप शोधकार्य सुरु आहे. बुधवारी सकाळी पेट्रोल पंपावरील इंधनाचा सर्व साठा रिकामा झाल्यानंतर राष्ट्रीय आपत्ती निवारण दल, महापालिका आणि पोलिसांनी पोकलेनच्या साहाय्याने होर्डिंगचा ढिगारा उपसायला सुरुवात केली. गॅस कटरच्या सहाय्याने होर्डिंगचे तुकडे करुन लोखंडी तुकडे बाजूला केले जात आहेत. गेल्या दोन ते तीन तासांमध्ये या लोखंडी ढिगाऱ्यातून तब्बल १८ बाईक्स आणि सहा ते सात कार बाहेर काढण्यात आल्या आहेत. ही परिस्थितीत पाहता होर्डिंगच्या

•➤ पान ५ वर

# कंत्राटी कामगारांची उपासमार

### ठेकेदाराने थकवले चार महिन्यांचे वेतन



● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील राजपुरी हद्दीतील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यात साफसफाईकरिता नऊ कंत्राटी कामगार व त्याच परिसरात असणारी खोकरी येथील एका कंत्राटी कामगारांची नेमणूक ठेकेदारांकडून करण्यात आली होती. यामध्ये सात पुरूष असून, तीन महिला कामगारांचा समावेश आहे. या कामगारांना गेल्या चार महिन्यांपासून वेतन रखडल्याने कामगारांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. थकीत वेतन त्वरित द्यावे, अशी मागणी जंजिरा किल्ल्यात काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांनी केले आहे.

जर कामगारांनी संप केला, तर किल्ल्यात अस्वच्छता पसरेल आणि याचा परिणाम पर्यटकांवर होईल. तरी ठेकेदारांनी या पगारावर अवलंबून न राहता आपल्या कामगारांना थोडं तरी वेतन देऊन शांत करावे. बिले पास झाली की उर्वरित वेतन पूर्ण करुन कामगारांना दिलासा द्यावा.

– बजरंग येलीकर, सहाय्यक संवर्धन पुरातत्व विभाग

ऐतिहासिक जंजिरा •➤ पान ५ वर

# कर्जतमध्ये मृतदेह

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायत हद्दीमधील धोत्रे आणि शिलारवाडी या गावांच्या मध्यभागी असलेल्या जंगलात मृतदेह आढळून आला आहे. पोलीस पाटील यांच्याकडून माहिती मिळताच कर्जत पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला. धोत्रे गावचे पोलीस पाटील मनोज रसाळ, शिलार गावचे पोलीस पाटील जनार्दन रनावरे यांना कर्जत पोलिसांना याबाबत माहिती दिली. मृत इसमाचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे असावे आणि १५ ते २० दिवसांपूर्वी त्याला त्या निर्जनस्थळी आणून टाकण्यात आले असावे, असा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे.

# शेतकऱ्यांचा एमआयडीसीला विरोध

- सुनावणीदरम्यान प्रकल्पग्रस्तांचे लेखी निवेदन
- ६१४ पैकी ५०० शेतकऱ्यांची उपस्थिती



। पेण । प्रतिनिधी ।

प्रस्तावित डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी पेण तालुक्यातील काराव, खारघाट, खारमाचेला, खारकारावी क्षेत्रात होणाऱ्या भूसंपादनाला प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. दरम्यान, पेण उपविभागीय कार्यालयात बुधवारी (दि. १५) भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांच्या अध्यक्षतेखाली हरकती अर्जांची सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीदरम्यान डोलवी औद्योगिक क्षेत्र प्रकल्पासाठी बाधित असलेल्या शेतकऱ्यांनी प्रकल्पाला विरोध असल्याची लेखी नोंद केली.

या एमआयडीसी प्रकल्पासाठी काराव ६४, खारघाट ३१७, खारमाचेला १२६ आणि खारकारावी १०७ शेतकरी बाधित होत असून, या सर्वांची आज संयुक्तरित्या सुनावणी घेण्यात आली. एकूण ६१४ शेतकऱ्यांपैकी जवळपास ५०० शेतकरी उपस्थित होते. इतर शेतकऱ्यांना नोटीस रात्री उशिरा ८ वाजल्यानंतर पोहोचली, त्यामुळे शेतकरी या सुनावणीसाठी उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र, हजर असलेल्या सर्व शेतकऱ्यांनी एकमुखी भूसंपादनाला विरोध केला असून, याबाबत वैयक्तिक आणि संयुक्तरित्या निवेदन भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार

•➤ पान ५ वर

# बर्निंग कारचा थरार




● (छायाचित्र : महेश पवार)

। नागोठणे । वार्ताहर ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अपघाताची मालिका कायम सुरू असतानाच नागोठण्याजवळील वाकण नाका येथे बर्निंग कारचा थरार पहायला मिळाला. कारमधील चार प्रवासी नाश्ता करण्यासाठी हॉटेलमध्ये गेलेले असल्याने तसेच कारला आग लागल्याचे समजताच कारमधील एका मुलीला बाहेर काढल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. हा अपघात बुधवारी (दि. १५) सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास घडला. ही आग नक्की कशामुळे लागली याचे कारण समजू शकलेले नाही.

सायन-मुंबई येथील खरात कुटुंबीय आपल्या डिझायर कारमधून खोपोली-पालीमार्गे गणपतीपुळे येथे फिरण्यासाठी चालले होते. कारमध्ये किशोर खरात, कांचन किशोर खरात, साक्षी खरात (२३),

•➤ पान ५ वर

# होर्डिंग्जची प्रशासनाला धास्ती

- जिल्ह्यातील होर्डिंगची होणार पडताळणी
- नगरपालिका प्रशासनासह अन्य यंत्रणा लागली कामाला

। अलिबाग । प्रतिनिधी ।

घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेनंतर रायगड जिल्हा प्रशासनानेदेखील अशा होर्डिंगची धास्ती घेतली आहे. जिल्ह्यातील होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यापासून धोकादायक होर्डिंग्ज काढण्यासाठी नगरपालिकेपासून वेगवेगळी शासकीय यंत्रणा कामाला लागली आहे.

वादळी अवकाळी पावसामुळे घाटकोपर येथील एक लोखंडी होर्डिंग्ज पेट्रोल पंपावर कोसळले. त्यामध्ये १४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर ५० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. या दुर्घटनेनंतर शासन खडबडून जागे झाले. जिल्ह्यातील यंत्रणादेखील ॲक्शन मोडवर आली आहे. एसटी महामंडळ रायगड विभागाच्या

•➤ पान ५ वर



### स्थानकातील होर्डिंग्ज धोकादायक

अलिबाग एसटी स्थानकात ठिकठिकाणी मोठ मोठे जाहिरातींचे होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत. स्थानकाच्या आवरातील एक होर्डिंग्ज जीर्ण झाले आहे. ते वादळी पावसात पडण्याची भीती आहे. मात्र, एसटी महामंडळाकडून ते काढण्यास टाळाटाळ होत असल्याच्या तक्रारी आहेत. घाटकोपर येथील दुर्घटनेकडून बोध घेऊन तरी स्थानकातील होर्डिंग्ज काढतील का, असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

अलिबाग शहरामध्ये बसस्थानकातच एक मोठे होर्डिंग्ज असून, ते खराब झाले आहे. ही बाब आगार व्यवस्थापकांच्या निदर्शनास आणून दिली आहे. ते काढण्याच्या सूचनादेखील केल्या आहेत. मात्र, अद्यापपर्यंत त्यांच्याकडून कार्यवाही झालेली नाही.

– अंगाई साळुंखे, मुख्याधिकारी तथा प्रशासक, अलिबाग न.पं.

# मीठ व्यवसायाला नवसंजीवनी

### वडखळ, वाशी, शिर्की परिसरात मिठागरे जोमात

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

समुद्रातील वाढते प्रदूषण, कंपन्यांमार्फत होणारा भराव, बदलते हवामान अशा अनेक कारणांमुळे पारंपरिक मीठ व्यवसाय कालबाह्य होण्याच्या मार्गावर होता. मात्र, पेणमधील काही शेतकऱ्यांनी पुढाकार घेत या व्यवसायाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला आहे. शिर्की, वाशी, वडखळ परिसरात तीनशे एकर क्षेत्रामध्ये आता मिठागरे उभी राहिली असून, यातून अनेकांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. त्यामुळे हा व्यवसाय आता पुन्हा उभारी घेण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येत आहे.

पेण तालुक्यातील शेतकऱ्यांचा मीठ तयार करण्याचा व्यवसाय पारंपरिक आहे. तालुक्यातील वाशी, वडखळ, शिर्की अशा अनेक भागातील शेतकरी हा व्यवसाय करीत होते. पूर्वी तालुक्यात सुमारे दोन हजार २०० एकर क्षेत्र मिठागरांनी व्यापले होते. त्यातून मोठ्या प्रमाणात मिठाचे उत्पादन घेतले जायचे. यातून एक हजारहून अधिक

माझे आजोबा, वडील पूर्वी मीठ तयार करण्याचा व्यवसाय करीत होते. आता मी हा व्यवसाय करीत असून, आमची चौथी पिढीदेखील काम करीत आहे. दिवाळीपासून या व्यवसाला सुरुवात होते. मीठ तयार होण्यासाठी १५ दिवसांचा काळ जातो. आता ६५ एकर क्षेत्रामध्ये मिठागरे तयार केली असून, यासाठी सुमारे ३५ लाख रुपये खर्च आला. खर्च वजा करून सुमारे २५ लाख रुपये निव्वळ नफा यातून मिळेल, अशी अपेक्षा आहे.

– कल्पेश पाटील, मीठ व्यावसायिक, पेण




वाशी, शिर्की, चिखली, वडखळ या परिसरात सुमारे ३५० एकर क्षेत्रामध्ये मिठागरे तयार करण्यात आली आहेत. या व्यवसायातून लाखोंचे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळत आहे. हे मीठ वीटभट्टी, आंबा कलम, बर्फ कारखाना, तसेच खाण्यासाठीदेखील पाठविले जात आहे. तीन ते चार रुपये प्रति किलो दराने त्याची विक्री होत आहे. आतापर्यंत येथील उत्पादित २० हजार टन मीठ स्थानिक बाजारात, तसेच रायगडसह रत्नागिरी व अन्य जिल्ह्यांतील बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती कल्पेश पाटील यांनी दिली.

● (छायाचित्र : समीर मालोदे)




# हे इंजिन लावतात अन् धापा टाकतात

## ■ ठाकरेंची महायुतीवर घणाघाती टिका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**संभाजी महाराज ज्याप्रमाणे औरंगजेबापुढे झुकले नव्हते. तसेच, आम्ही हि झुकणार नाहीत. देशाचा पंतप्रधान हा कुठल्याच पक्षाचा नसतो, परंतु आज मोदी भाजपचा प्रचार करत आहेत. त्या पदाची पंतप्रधानांनी गनिमा राखायला हवी. राज्याचे उपमुख्यमंत्री सांगतात कि, राज्यात डबल, टिबल इंजिन आणि अनेक डबे जोडले जात आहेत. परंतु, आता कितीही इंजिनाचे डबे लावा यावेळी तुमचे दिल्लीचे इंजिन इंडिया आघाडी बदलून टाकणार आहे. अशी घणाघाती टीका शिवसेना पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी वसईमध्ये केली.**



महाविकास आघाडीच्या उमेदवार भारती कामडी यांच्या प्रचारासाठी उद्धव ठाकरे यांची प्रचार सभा मंगळवारी संध्याकाळी वसईच्या माणिकपूर येथील मैदानात आयोजित करण्यात आली होती.

वसई महाविकास आघाडीच्या जाहीर प्रचार सभेत त्यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. भाजप गोमूत्रधारी तसेच बुरसटलेल्या मानसिकतेचा पक्ष असून मला नकली शिवसेना म्हणणारे भाकड जनता पक्षाचे नेते बेअकली नेते आहेत, अशा शब्दात त्यांचा खरपूस समाचार घेतला. आपल्या पाऊण तासांच्या भाषणात उद्धव ठाकरे यांनी भाजप तसेच नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर घणाघाती हल्ला केला. पंतप्रधान हा कुठल्या पक्षाचा नसतो मात्र नरेंद्र मोदी हे पंतप्रधान असून भाजपाचा प्रचार करत आहेत. तो प्रचार करणे त्यांनी थांबावावे, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. तसेच, तुम्ही कितीही इंजिनाचे डबे लावा. पण हे इंजिन लावतात अन् धापा टाकतात. तुमचे दिल्लीचे इंजिनच बदलून टाकू, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

भाजपाने देशात कंत्राटी पद्धती आणली आहे. देशात कोणाला कायम स्वरूपी रोजगार नाही, कंत्राटी पद्धतीने अग्निवीर आणि कामगार पद्धती आणली आहे. त्यामुळे तुमचे कंत्राट येत्या निवडणुकीत रद्द करू, असे उद्धव ठाकरे म्हणाले. जीएसटीमुळे व्यापारी देशोधडीला लागले आहेत. आमची सत्ता आल्यावर हा 'कर दहशतवाद' संपवणार असेही त्यांनी सांगितले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान बदलण्याचे भाजपाचा षडयंत्र आहे. महाराष्ट्राबद्दल असलेल्या आकसातून हे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोपही त्यांनी या प्रचारात केला.

राम मंदिरावरून भावनिक राजकारण करणाऱ्या भाजपाने राष्ट्रपती द्रोपदीमुळे यांना सोहळ्यासाठी का बोलावले नाही? त्या आदिवासी म्हणून त्यांना डावलले का? असा सवाल त्यांनी प्रचारात केला. राम मंदिर हे मोदींच्या नाही तर न्यायालयाच्या निर्णयानंतर झाल्याचेही त्यांनी सांगितले. तर, मोदी सरकारकडून सुरूअसलेल्याफसव्याजाहिरातींचाही समाचार घेतला. पंतप्रधान आवास योजना, गॅस योजना या फसव्या योजना असून त्यातून नागरिकांची दिशाभूल केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे यांनी सांगितले कि, आमच्यावर घराणेशाहीचा आरोप करता तर आपल्याघरातील आपले सुपुत्र काय करतात आणि तुम्ही बोहल्यावर नवरदेवासारखे का चढला? असा सवाल केला. गुजरात डँगली नंतर अटलबिहारी वाजपेयी यांनी राजधर्म पाळण्याचे आपणास सांगितले होते. त्यावेळी आपल्या मागे शिवसेना प्रमुख उभे राहिल्याने आज आपण हे दिवस बघत आहात. त्याच सेना प्रमुखांच्या मुलाला आणि शिवसेनेला नकली बोलता. हे तुमचे राजकारण, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी शेवटी केली.

### प्रफुल्ल पटेल यांच्या कृतीचा निषेध

**प्रफुल्ल पटेल यांनी नरेंद्र मोदींना जिरेटोप घातला. यावरून विरोधक टीका करत आहेत. प्रफुल्ल पटेल यांच्या कृतीचा ठाकरेंनीही निषेध केला. प्रफुल्ल पटेलचा अर्ज भरायला नरेंद्र मोदी गेले होते. प्रफुल्ल पटेल तुम्ही लाचार झालात, मोदींच्या चरणी लीन होताना महाराजांची टोपी डोक्यावर ठेवता? असा सवाल करत पटेल यांचा खरपुस समाचार उद्धव ठाकरे यांनी घेतला आहे.**

# कल्याणमध्ये शिंदे गटात मानापमानाचे नाट्य

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



कल्याण, भिवंडी, ठाणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा झाली. या सभेपूर्वी कल्याणमध्ये जिल्हा पदाधिकाऱ्यांचे मानापमान नाट्य रंगले. जिल्हाप्रमुखांना व्यासपीठावर जागा न देता आमदार, शहरप्रमुखांना तसेच इतर पदाधिकाऱ्यांना व्यासपीठावर स्थान दिल्याने कल्याण मुरबाड जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी नाराजी व्यक्त करत थेट राजीनामा दिला आहे. वर्षभरापूर्वी अरविंद मोरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला रामराम करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता.

एकनाथ शिंदे यांनी कल्याण आणि मुरबाड जिल्हा प्रमुख पदाची जबाबदारी अरविंद मोरे यांच्याकडे दिली होती. सध्या अरविंद मोरे कल्याणचे महायुतीचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदेंचा प्रचार करत होते. मोदींच्या सभेत व्यासपीठावर जागा न दिल्याने अरविंद मोरे नाराज होते. अरविंद मोरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहित नाराजी व्यक्त केली आणि राजीनामा स्वीकारण्याची विनंती केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्यासपीठावर निमंत्रण नसल्याने शहरप्रमुख पदाचा राजीनामा स्वीकारण्याची मुख्यमंत्र्यांना केली पत्राद्वारे विनंती केली.

## वे|ध|क

### नाशिकचे राजकीय वातावरण तापले

**नाशिक :** नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी २० मे रोजी मतदान पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर सध्या नाशिकचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. नाशिकमध्ये मविआचे उमेदवार राजाभाऊ वाजे, महायुतीचे उमदवार हेमंत गोडसे आणि अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराज यांच्या प्रमुख लढत होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उद्धव ठाकरे, शरद पवार या दिग्गज नेत्यांच्या त्यांच्या उमदवारांसाठी सभा होत असताना दुसरीकडे शांतीगिरी महाराज देखील मागे नाही.

### माझं टार्गेट महाराष्ट्र नासवणारे..

**मुंबई :** सुषमा अंधारेंनी राज ठाकरेंचं नाव घेत हल्लाबोल केला. इतकेच नाहीतर देवेंद्र फडणवीस यांच्यावरही निशाणा साधला. यावेळी सुषमा अंधारे म्हणाल्या, राज ठाकरे हा माझा अजिबात विषय नाही पण अडचण काय झाली त्यांना जी सुपारी मिळाली होती एकनाथ शिंदे, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पहिली सुपारी माझ्या नावाची होती. महायुतीने माझा धसका घेतलाय राज ठाकरे माझं कधीही टार्गेट नव्हतं, असं त्यांनी म्हटलं. तर मी राज ठाकरेंना मानतही नाही. राज ठाकरे हे माझ्यावर बोलले म्हणून माझा हिसका दाखवला मी त्यांच्यावर बोलतही नाही माझं टार्गेट हे इथले कळसूत्री बाहुल्या हलवणारे देवेंद्र फडणवीस हे टार्गेट असल्याचे सुषमा अंधारे म्हणाले.

# घड्याळ चालणार की तुतारी वाजणार?

**। पुणे । प्रतिनिधी ।**




शिरूर लोकसभा मतदार संघासाठी चुरशीने मतदान झाल्यानंतर कुणाची सरशी होणार आणि कोण तोंडघशी पडणार याबाबत, आपापले मुद्दे प्रभावीपणे मांडून आडाखे बांधले जात आहेत. मतदार हुशार असल्याने भल्याभल्यांचे अंदाज चुकणार असून, 'घड्याळ चालणार की तुतारी वाजणार' अशा चर्चांनी जोर धरला आहे.

शिरूर मतदार संघात डॉ. अमोल कोल्हे व शिवाजीराव आढळराव पाटील या आजी-माजी खासदारांत प्रत्यक्षात काँटे की टक्कर झाली असली तरी ज्येष्ठ नेते शरद पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या या मतदार संघात पारंपारिक लढतीत प्रचारापासून सुरू झालेली चुरस मतदानापर्यंत कायम राहिली. उमेदवारी, प्रचार आणि प्रत्यक्ष मतदानातील चुरशीमुळे विजयाचा कौल कुणाला मिळणार, याचा अंदाज भल्याभल्यांना येऊ शकलेला नाही. या अनुभवी उमेदवारांत कोण बाजी मारणार, याबाबत वेगवेगळे तर्क-वितर्क लढविले जात आहेत. दोन्ही बाजूचे उमेदवार, स्थानिक नेते, पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते आपापल्या विजयाचा दावा करीत असले तरी राजकीय तज्ज्ञ आणि निवडणुकांतील धुरीण मात्र ठामठोक बोलायला तयार नाहीत. शिरूरसह, आंबेगाव, खेड, जुन्नर हे ग्रामीण तर हडपसर व भोसरी या शहरी भागाचा समावेश असलेल्या या संमिश्र जनभावनेच्या मतदार संघातील निकालाचा अंदाज बांधणे बहुतेकांना कठीण जात आहे.

# जयंत पाटलांचे मोठे विधान

**नाशिक :** पुलाखालून बरेच पाहणी वाहून गेले आहे. नवीन चेहरे पुढे येत आहेत. तरुण मंडळी चांगले काम करत आहे. तरुणांना संधी देण्यासाठी शरद पवार हे नेहमीच आग्रही असतात. पण एखाद्या मतदारसंघात अजिबात पर्याय नसेल तर परत येणाऱ्या आमदारांचा त्या मतदारसंघात विचार केला जाईल, असे मोठे विधान शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला आहे. जयंत पाटील यांनी अजितदादा गटात गेलेल्या आमदारांसाठी परतीचे दरवाजे उघडे केल्याने हे आमदार त्यांना प्रतिसाद देतात का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जयंत पाटील हे नाशिकच्या येवल्यात आले होते.

# महायुतीकडून दोन हजार कोटींचे वाटप

## ■ रोहित पवार यांचा गंभीर आरोप

**। नाशिक । प्रतिनिधी ।**



लोकसभा निवडणुकीत महायुती व मित्र पक्षांकडून मोठ्या निवडणुकीत पैशाचा वाटप सुरू आहे. बारामती, अहमदनगरनंतर आता नाशिकमध्ये महायुती पैशाचे वाटप करत आहे. महायुती राज्यात दोन हजार कोटी रुपये खर्च करत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे.


प्रचार दौऱ्यानिमित्त नाशिकमध्ये आलेले आमदार रोहित पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी पवार म्हणाले की, अहमदनगर लोकसभा मतदारसंघात उन्हाळ्यातही पैशांची धुवांधार बरसात झाली आहे. या संदर्भात एका पोस्टच्या माध्यमातून व्हिडिओ देखील पोस्ट केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांनी नाशिकमध्ये पैशांच्या बॅगा भरून आणल्याचा आरोप केला होता. त्यावर पवार म्हणाले की, मुख्यमंत्री मुक्कामी राहणार नव्हते. आता फाईल सही करू शकत नाहीत. असे असाताना ९ बॅगा कशासाठी आणल्या, हा प्रश्न उपस्थित होतो. नाशिक आणि दिंडोरीचे महाविकास आघाडीचे उमेदवार सामान्य आहेत. महायुतीचे उमेदवार बलाढ्य आहेत. त्यामुळेनाशिक, दिंडोरीतही पैसेवाटप होईल, असे त्यांनी सांगितले.

तसेच, राज्यात महायुतीला १६ ते १८ जागा, महाराष्ट्रात महायुतीला किती जागा मिळणार, यावर रोहित पवार यांनी भाष्य केले. भारतीय जनता पक्षाला १३ ते १४ जागा, शिवसेनेला (शिंदे) २ ते ३ जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) एकही जागा मिळणार नाही. यामुळे महायुतीला राज्यात १६ ते १८ जागा मिळतील, असा दावा पवार यांनी केला.

# ठाकरे गटाचा मोदींना टोला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

उत्तर प्रदेशात ना राममंदिराची लाट मतदानात दिसली ना विकसित भारताची. मोदी यांनी मतदानाच्या प्रत्येक टप्प्यात प्रचाराची वेगवेगळी शस्त्र बाहेर काढली, मात्र सगळीच वाया गेली, असे ठाकरे गटाने म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मला 'गंगामय्या'ने दत्तक घेतले आहे, असे विधान केल्याच्या मुद्द्यावरुन उद्धव ठाकरे गटाने पंतप्रधानांना लक्ष्य केले आहे. वाराणसीमध्ये उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी पंतप्रधानांनी दिलेल्या एका मुलाखतीमध्ये गंगा नदीशी आपले भावनिक नातं असल्याचे पंतप्रधानांनी म्हटले. मात्र, यापूर्वीही २०१४ आणि २०१९ मध्ये येथील लोकांनी तुमच्यावर विश्वास दाखवला होता, अशी आठवण करुन देत ठाकरे गटाने मोदींवर टीका केली आहे. पंतप्रधान मोदी हे खूप संवेदनशील नेते आहेत, असा त्यांच्या भक्तमंडळींचा दावा असतो. स्वतः मोदी हेदेखील जाहीर कार्यक्रमात अधूनमधून भावूक वगैरे होताना दिसतात. त्यामुळे भक्तमंडळींच्या दाव्यात कळत-नकळत हवा भरली जात असते. आताही वाराणसीमध्ये मोदी असेच भावूक झालेले दिसले.



# वाढलेला टक्का कोणाच्या पथ्यावर?

**। नंदुरबार । प्रतिनिधी ।**

नंदुरबार लोकसभा मतदार संघाचा निवडणुकीत गेल्या तीन पंचवार्षिकपासून मतदानाचा टक्का थोड्या फार फरकाने का होईना वाढत आहे. याही वर्षी सरासरी दोन टक्के मतदान वाढले आहे. दोन टक्के असले तरी ते सुमारे पावणे तीन लाख मतदान आहे. वाढलेल्या या पावणेतीन लाखांचा धनी कोण, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. वाढीव मतदान ज्याच्या पथ्यावर पडेल, तो नंदुरबारचा खासदार, असे गोळा बेरीज करत चर्चा रंगू लागल्या आहेत.

नंदुरबार लोकसभा मतदार संघात २०१४ पासून विचार केल्यास नंदुरबार लोकसभेसाठी सरासरी ६३ टक्के मतदान झाले होते.





तर २०१९ ला ६८.३३ टक्के मतदान झाले होते. अत्यंत अटीतटीच्या लढतीत काँग्रेसचे उमेदवार ॲड के.सी.पाडवी यांना पराभूत करीत डॉ. हिना गावित ९५ हजार पाचशे मतांनी विजयी झाल्या होत्या.

मागील पंचवार्षिक निवडणुकीत तुलनेत दोन टक्यांनी मतदान वाढले. हे वाढलेले मतदान कोणाच्या पथ्यावर पडते हे सांगणे कठीण आहे. कारण भाजपच्या उमेदवार डॉ. हिना गावित यांच्यासमोर काँग्रेसचे ॲड. गोवाल पाडवी उमेदवार आहेत. त्यांनी स्वपक्षासह भाजपमधील नाराज गट, महायुतीतील मित्र पक्ष यांना आपलेसे करीत त्यांची मदत घेतली आहे. त्यामुळे वाढलेले मतदान ज्याचा पथ्यावर पडेल, त्याला नक्कीच नंदुरबारची जनता खासदार म्हणून स्विकारेल, अशी चर्चा आहे.

# वसंत मोरेंना खोचक टोला

**। पुणे । प्रतिनिधी ।**

माझ्यावर जसा गुन्हा दाखल केला तसा भाजप पदाधिकाऱ्यांवर करा, अशी मागणी लोकसभा निवडणुकीचे उमेदवार आणि कसब्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी केली आहे. रवींद्र धंगेकर यांनी मुलाखत सुरू असताना थेट डीसीपींना फोन लावला. सहकारनगर पोलीस ठाण्याबाहेर आंदोलनामुळे रवींद्र धंगेकर यांच्यावर पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पुणे पोलिसांकडून रवींद्र धंगेकर यांच्यावर ही कारवाई करण्यात आली होती. रवींद्र धंगेकर यांनी सहकार नगर पोलीस ठाणे येथे भाजपविरोधात आंदोलन केले होते. या आंदोलनात बेकायदेशीर पद्धतीने जमाव केल्याप्रकरणी पुणे पोलिसांकडून रवींद्र धंगेकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पैशांचे वाटप भाजपकडून केले जात असल्याचा आरोप रवींद्र धंगेकर यांनी केला होता.



तर भाजप पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करत रवींद्र धंगेकरांनी वसंत मोरेंना टोला लगावला आहे. वसंत मोरे यांना ४ लाख मतं मिळणार असतील तर आमचं डिपॉझिट जप्त होईल, असे म्हणत वसंत मोरेंना रवींद्र धंगेकरांनी खोचक टोला लगावला आहे.

# अंदाज बांधता न येणारी निवडणूक

**। अहमदनगर । प्रतिनिधी ।**

अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील चुरस कधी नव्हती तेवढी यंदा झाली. वास्तविक पारनेरचे आमदार नीलेश लंके हे लोकसभा निवडणूक कधी लढतील, असे वाटत नव्हते. पण, काही महिन्यांपूर्वी त्यांनी लोकसभेच्या मैदानात उतरण्याची तयारी केली आणि झालेही तसेच. जर लंके उमेदवार नसते, तर डॉ. सुजय विखे पाटील हे मोठ्या मताधिक्याने निवडून आले असते. तसेच लंकेंच्या गुन्हेगारी आणि दहशतीवरही विखे पाटील यांनी प्रहार केले. निवडणूक कशी जिंकायची, याचा अनुभव पाठिशी असलेल्या विखे पाटील घराण्याला मात्र ही निवडणूक तशी सोपी गेली नाही. लंकेंचा विचार केला तर ते जिंकले काय किंवा हरले काय, त्यांच्याकडे गमावण्यासारखे काहीच नाही. या मतदारसंघात कोण निवडून येईल, याचा अंदाज बांधता येत नाही.

# अजित पवारांना शून्य जागा

## पृथ्वीराज चव्हाणांचा दावा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सत्ता बदल होणार असा मोठा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. दरम्यान, राज्यात अजित पवारांची राष्ट्रवादी एकाही जागेवर विजयी होणार नाही, असा दावाही पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.



पुढे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, आम्ही नुसत्या घोषणा करत नाही. २०१९ मध्ये भाजपला प्रत्येक राज्यात किती जागा आल्यात हे पाहिलं तर कोणत्या राज्यात भाजपचा आकडा यंदा २०१९ च्या तुलनेत वाढेल? भाजप दावा करतोय की, बंगाल आणि उत्तरप्रदेशात आमचा उमेदवार विजयी होईल. पण इतर ठिकाणी तुम्ही अव्वल आहात. त्यामुळे कुठे वाढणार याचा अंदाज नाही. आम्ही सांगू शकतो आम्ही कोणत्या जागा जिंकणार? कर्नाटक, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजराज, तेलंगणा, हरियाणा, दिल्ली या जागा जिंकणार असल्याचा दावाही पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. तर, यावेळी राज्यात अजित पवार यांना शून्य जागा मिळणार असून बारामतीत सुनेत्रा पवार हरणार असल्याचा दावाही केला.

# मोदींच्या सभेसाठी आचारसंहितेचा भंग

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात लोकसभा निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला असून लोकसभा निवडणुकीसाठी काही ठिकाणी प्रचार सुरु आहे. तर काही ठिकाणी मतदान पार पडले आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आदर्श आचारसंहिता जाहिर करण्यात आलेली आहे. असे असताना प्रभारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या डागडूजीची कामे करण्यात येत असून स्वच्छतेसाठी स्थानिक प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येत आहे. एकप्रकारे हा निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आदर्श आचारसंहितेचा भंग आहे. त्यामुळे याप्रकरणी चौकशी करुन आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर नियमांनुसार उचित कारवाई करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे.

# राज ठाकरे हे इव्हेंट सेलिब्रिटी

**मुंबई :** राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आहे. तसेच राज ठाकरे यांनी माझे वडील चोरले हा निवडणुकीचा मुद्दा कसा काय असू शकतो? असा प्रश्न विचारला. आणि शरद पवारांवरही जोरदार टीका केली. या सगळ्यानंतर आता मोदींसह एकाच मंचावर दिसणार आहेत. मात्र, राज ठाकरे हे इव्हेंट सेलिब्रिटी आहेत आणि भाजपाचं स्क्रिप्ट वाचतात अशी टीका काँग्रेसने केली आहे.

# भाजप प्रवेशाच्या चर्चेला पूर्णविराम

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

काँग्रेस नेते विश्वजीत कदम भाजपमध्ये प्रवेश करतील, असे आरोप सांगलीत गेल्या दोन महिन्यांपासून केले जात होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी विधीमंडळाबाहेर झालेल्या संवादानंतर सातत्याने विश्वजीत कदम भाजपात जाणार अशा चर्चा रंगू लागल्या होत्या.

विश्वजीत कदम म्हणाले, मी भाजपात जाणार हे कशाच्या आधारे बोलले जाते? जेव्हा राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात आली. त्यावेळी राहुल गांधींसोबत ३२५ किलोमीटर केवळ दोन नेते चालले. अनेक कार्यकर्ते चालले, अनेक नेते चालले. त्यांच्याबाबत मला आदर आहे. प्रत्येकजण आपल्या तब्येतीनुसार चालले असेल. मी नांदेडपासून बुलढाणापर्यंत त्यांच्यासोबत चाललो. मी जर राहुल गांधींसोबत ३०० किलोमीटर चालत असेन तर भाजपात प्रवेश करण्याचा प्रश्न येतोच कुठे? असा सवालही विश्वजीत कदम यांनी केला.



पुढे कदम म्हणाले, दोन महिन्यांचा कालावधी उत्सुकतेचा होता. कठिण होता, संघर्षाचा होता. शेवटी काही क्षणाकरिता निराशेचा देखील होता. एखाद्या व्यक्तिमत्वाला जेव्हा एखादी गोष्ट हवी होती. त्यांची ती इच्छा होती. ती इच्छा पूर्ण करण्यासाठी जे करावं लागतं ते मी करत होतो. शेवटी त्याला अचानकपणे एक वेगळं वळण आलं.

त्यानंतर ज्या भावना एखाद्या व्यक्तीला जाणवतात, त्या सगळ्या भावनांमधून मी गेलो आहे. मी सांगलीच्या जागेसाठी लढत होतो, तो मतदारसंघ काँग्रेस पक्षाला मानणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था असतील किंवा इतर ठिकाणी काँग्रेसचा कार्यकर्ता आहे.

# आदित्य ठाकरेंचा मनसैनिकांना 'बिनशर्त' टोला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

देशभरात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. पाचव्या टप्प्यात मुंबईतील मतदारसंघात मतदान होणार आहे. यावेळी मनसेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आहे. दरम्यान, आता आदित्य ठाकरे यांनी एका मुलाखतीत मनसेवर टीका केली आहे. गुढी पाडवा मेळाव्यादिवशी राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. यानंतर राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. आदित्य ठाकरे यांनी रोजगार, गुजरातला गेलेल्या कंपन्या या मुद्द्यावरुन मनसेला टोला लगावला आहे.





यावेळी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, मनसेने बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. मला मनसेच्या कार्यकर्त्यांना विचारायचे आहे की, गेल्या दोन अडीच वर्षात याच भाजपाने महाराष्ट्रातील वेदांता फॉक्सकॉन यासह एक लाख रोजगार महाराष्ट्रातून उचलून गुजरातला दिला आहे. बल्क ड्रग पार्क यातून ३० ते ४० हजार जणांना रोजगार मिळणार होता, तोही गुजरातला गेला. मेडिकल डिव्हाईस पार्क ४० हजार रोजगार मिळणार होता उचलून गुजरातला पाठवला. टाटा एअरबस असेल, सोलर प्लँट असेल, टेक्टाईल पार्क असेल, हेच काय आपली वर्ल्डकपची फायनल आपल्या क्रिकेटची पंढरी आपण ज्याला म्हणतो वानखेडे येथून उचलून गुजरातला घेऊन गेले. मनसेचा बिनशर्त पाठिंबा या सगळ्याला आहे का, असा खोचक टोला आदित्य ठाकरे यांनी मनसेच्या कार्यकर्त्यांना लगावला.

### भूमिपुत्र रोजगार मागतोय

**मनसे एवढ्या दिवस भूमिपुत्रांसाठी, मराठी माणसांसाठी भांडत होते, असे आम्हाला सांगितले. आज आपला भूमिपुत्र रोजगार मागत आहे. त्यांची सगळी स्वप्न चिरडली जात आहेत. हे सगळे उद्योगधंदे गुजरातला जात आहेत. गुजरातला जाऊन त्यांचे भले होत आहे असे नाही. त्यांनी आता तिथे जाऊन आम्ही कामच करु शकत नाही, असे सांगितले आहे. सेमी कंडक्टर इंडस्ट्री आपल्या देशातून निघून गेली, असेही आदित्य ठाकरे म्हणाले. टेस्ला मुंबईत येणार होती, त्यांचे शोरूम आणि गोडाऊन मुंबईत होणार होते. पण, केंद्र सरकारच्या अटींमुळे ते येऊ शकले नाहीत, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.**

निवडक

## संभाजी महाराज जयंती

**उरण :** चिरनेर येथील छावा प्रतिष्ठान, युद्धनौका ग्रुप, ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली. रायगड जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरी केली जाणारी श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती हि एकमेव आहे. यंदा जयंतीचे हे १० वे वर्ष आसल्याची माहीती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सुभाष कडू यांनी दिली. या कार्यक्रमाला महेंद्र घरत, तेजस डाकी, वैजनाथ ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

## वर्धापन दिन साजरा

**उरण :** सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या व गोर गरिबांना नेहमी मदतीचा हात देणाऱ्या गोल्डन ज्यूबली मित्र मंडळ सारडे या सामाजिक संस्थेचा ३६ वा वर्धापन दिन उरण येथील राधाकृष्ण मंदिर सारडे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत व विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी पनवेल महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, रवीशेठ पाटील, राजू मुंबईकर, भारत भोपी, आदी मान्यवरांनी गोल्डन ज्यूबली मित्र मंडळाच्या विविध सामाजिक कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मनोरुग्ण महिला बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील शिल आश्रम येथून एक मनोरुग्ण महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सविता तात्याराव गायकवाड (२३) असे या महिलेचे नाव असून, उंची ५ फुट २ इंच, अंगाने मध्यम, रंग सावळा, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे लांब, डोळे काळे असून अंगात काळ्या गुलाबी रंगाचा कुडता व पायजमा तसेच पायात चॉकलेटी रंगाची चप्पल आहे. महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ०२२-२७४५२४४४ यांच्याशी संपर्क साधावा.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**पनवेल :** कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण समाज पनवेलच्यावतीने ओरायन मॉल यांच्या सहयोगाने रविवारी (दि.२) पनवेल येथील ओरायन मॉल येथे सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजाचा हा सेवाभावी उपक्रम असून जे रक्तदान करू इच्छितात त्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी श्याम वालावलकर-९९६७५८४३५१, हरेश परुळेकर- ९८६९३७५२१५, यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जैन मंदिराचा रौप्य महोत्सव

**कर्जज :** शहरातील जैन मंदिराचा जीर्णोध्दार होऊन पंचवीस वर्षे झाली. त्यानिमित्ताने जैन धर्मीयांच्यावतीने रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परमार कुटुंबीयांना मंदिरावर ध्वज चढविण्याचा मान मिळाला. केसरीमल प्रेमचंद परमार यांच्या कुटुंबियांनी पंचवीस वर्षांपूर्वी जैन मंदिरावरील ध्वजाचा चढावा घेतला होता. गेल्या पंचवीस वर्षापासून तेच ध्वज चढवत आहेत. यावर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# कर्जत तालुका दीड दिवस अंधारात

## वादळी वाऱ्याने शेकडो विजेचे खांब कोसळले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्याला चार दिवस वादळी वाऱ्याने झोडपले आहे. त्यात १३ आणि १४ मे रोजी आलेल्या वादळी वाऱ्याने अनेक घरांचे तसेच झाडांचे नुकसान केले आहे. दरम्यान, वादळी वाऱ्यात तालुक्याच्या बहुसंख्य भागात विजेचे खांब कोसळले असल्याने तब्बल दीड दिवस कर्जत तालुका अंधारात होता.**





हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार ११ मे पासून अवकाळी पाऊस झाला आहे. त्या अवकाळी पावसाआधी १२ मे रोजी कशेळे, खांडस भागात तर १३ मे रोजी कर्जत तालुक्यात पाषाने-कळंब, देवपाडा, नेरळ परिसरात वादळ आले होते. तर १४ मे रोजी कर्जत तालुक्यातील माणगाव, वाकस, कशेळे, कडाव, खांडस परिसरात वादळी वाऱ्याने झाडे कोसळले. तसेच, घरांचे नुकसान आणि विजेचे खांब कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. यात घरांचे नुकसान मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून सर्वाधिक नुकसान महावितरण विभागाचे झाले आहे.

> **वादळी वाऱ्याने कोसळलेले विजेचे खांब पुन्हा उभे करून वीज पुरवठा सकाळी काही तास सुरू करण्यात आला होता. कर्जत शहर आणि कडावमध्ये वीज पुरवठा रात्री देखील सुरू होता. सकाळी पुन्हा वीज खंडित करून उर्वरित कामे पूर्ण करण्यावर आमचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी कामे मार्गी लावत आहेत.**
> **-गणेश देवके, उपअभियंता, कर्जत**

महावितरणचे विजेचे खांब कोसळल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता आणि कोसळलेले विजेचे खांब पुन्हा उभे करण्यासाठी १४ मे रोजी सकाळी नऊ पासून शट डाऊन घेण्यात आला होता. मात्र, संध्याकाळी चार पासून पुन्हा वादळी वाऱ्याने अवकाळी पावसासह हजेरी लावली आणि वीज पुरवठा खंडित झाला. तो पुर्ववत होण्यास सकाळ झाली. कर्जत आणि कडाव परिसर वगळता रात्री संपूर्ण कर्जत तालुका अंधारात होता. माथेरान देखील अंधारात होते. सकाळी दीड तासासाठी वीज पुरवठा सुरू झाला आणि पुन्हा उर्वरित कामे करण्यासाठी महावितरणकडून वीज खंडित करण्यात आली.

### महावितरण रात्रभर ऑन ड्युटी

**या काळात उकाड्यामुळे कर्जत तालुका हैराण होता. मात्र वादळी वाऱ्याने विजेचे खांब कोसळल्याने सर्व भागात रात्रीच्या वेळी देखील स्थानिक लोकांकडून नवीन विजेचे खांब उभे करण्यासाठी महावितरण ला सहकार्य केले जात होते. या वादळात कर्जत तालुक्यातील मुख्य वीज वाहिनींचे ५६ विजेचे खांब हे झाडे उन्मळून आणि जमिन खचल्याने कोसळले आहेत. ते उभे करण्यात येत आहेत. त्याचवेळी गावातील अंतर्गत वीज पुरवठा करणारे तब्बल ७० खांबही कोसळलेले असल्याने बदलावे लागले आहेत. त्यासाठी काही भागात रात्री अडीच तीन पर्यंत तर काही भागात पहाटे पाच पर्यंत महावितरणचे अभियंते, वीज कर्मचारी आणि महावितरणचे ठेकेदारांकडून वीज पुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू होते.**



## राष्ट्रसेविका समिती वर्गाचा शुभारंभ

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा राष्ट्रसेविका समितीच्या प्रारंभिक वर्गाचा शुभारंभ नुकताच मुरुड येथील हिंदू एज्युकेशन सोसायटीमध्ये उषा खोत यांच्या हस्ते करण्यात आला. प्रमुख वक्त्या म्हणून कोकण प्रांत बौध्दिक प्रमुख प्रेरणा क्षीरसागर या उपस्थित होत्या.

यावेळी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, राष्ट्रसेविका समिती भारतीय संस्कृती आणि परंपरा जोपासण्यासाठी कार्य करणारी एक अग्रेसर हिंदु संघठन असुन नारी शक्ती ही राष्ट्राची आधार शीला आहे. महिलांना आत्मनिर्भर करून अनुशासन व स्वयंशिस्तीच्या बळावर या राष्ट्राला परमवैभवाप्रत नेण्याचे उदिष्ट असल्याचे स्पष्ट केले. वंदनीय लक्ष्मीताई केळकर यांनी १९३६ मध्ये वर्धा येथे राष्ट्र सेविका समितीची स्थापना केली. भारता खेरीज २२ देशात समिती कार्यरत असल्याची त्यांनी माहिती दिली.

तसेच, दि.१४ ते १९ मे या काळात समितीच्या स्वयंसेविका मैदानी खेळ, बौद्धिक, पर्यावरण स्वसंरक्षण संवर्धन कार्यशाळा आदी कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. १२ ते ३५ या वयोगटातील रायगड जिल्हातील ९ तालुक्यातील ५० सेविका प्रारंभिक वर्गास उपस्थित असल्याची माहिती जिल्हा कार्यवाहिका रुची काळे यांनी दिली.

## उरणमध्ये डिझेल तस्करी जोरात; कारवाईची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**



उरण परिसरातील समुद्र किनारी डिझेल व तेलाची तस्करी खुलेआम सुरू आहे. शासकीय यंत्रणेकडून कारवाई होताना दिसत नाही. तरी या माफियांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

जेएनपीटी बंदरात येणाऱ्या परदेशी जहाजातील कर्मचाऱ्यांशी संधान बांधून समुद्र किनाऱ्यापासून दूर काही नॉटिकल मैल अंतरावर उभ्या राहणाऱ्या जहाजातील डिझेल छोट्या बोटीत उतरवून खाडी मार्गाने तस्करी करण्याचे काम मागील काही वर्षांपासून जोरात सुरु आहे. पोलीस, तटरक्षक दल यांना या तस्करीची माहिती असून, त्यांच्या आशीर्वादानेच व्यवसाय राजरोसपणे सुरु आहेत, असा स्थानिकांचा आरोप आहे. परदेशी जहाजातून जवळपास ३० रुपये लीटरने मिळणारे हे डिझेल बाजारपेठेत जादा दराने विक्री करून महसूल बुडवण्याचे काम हे तस्कर करतात, असे म्हटले जाते.

सध्या डिझेलच्या वाढत्या किंमती पाहता, काळ्या बाजारातून गाडी व्यावसायिक डिझेल घेताना दिसत आहेत. पोलीस ठाण्यांचे सागरी मार्गाकडे दुर्लक्ष असल्याचेच दिसून येत आहे. कारण सर्रास खाडीच्या परिसरात डिझेलची तस्करी सुरू आहे. गेल्या १५ दिवसांत याचा ओघ वाढला आहे. हे समुद्र चाचे बाहेरून येणाऱ्या बार्जेसच्या चालकांकडून हजारो लिटर डिझेल घेत असतात आणि हे डिझेल साठवून ठेवतात. डिझेलच्या किंमती वाढल्याने मोठ्या प्रमाणात या डिझेललाही मागणी वाढते.



**आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल मनपाचे माजी विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी रेवदंडा येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन शुभेच्छा दिल्या आणि त्यांचे शुभाशीर्वाद घेतले.**



## अवकाळीमुळे वीट व्यवसायीक चिंताग्रस्त


**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

वातावरण बदलाचा फटका विट व्यवसायापासून ते पालेभाज्या ते फळ लागवड करीत असलेल्या शेतकऱ्यांना सुद्धा बसला आहे. दोन दिवसांपुर्वी सायंकाळी येत असलेल्या अवकाळी पावसाने सुरुवात केल्यामुळे आपल्या कच्च्या विट वाचविण्यासाठी व्यवसायिकांची तारांबळ उडाली. विटांचे नुकसान होउ नये यासाठी कर्मचाऱ्यांच्या मदतीने प्लॅस्टिक टाकण्यात आले. मे महिन्यात अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे अनेकांचे मोठे नुकसान झाले आहे. अवकाळी पाऊस केव्हा बरसेल याची काही शास्वती नाही. यामुळे वीटभट्टी मालकांचे अधिक मोठे नुकसान होणार या भीतीपोटी सायंकाळ होताच कच्च्या वीटा वाचविण्यासाठी वीटभट्टी मालकांची तारांबळ उडाली.

## आर्या बडे किल्ले येथे प्रथम

**। पाली । वार्ताहर ।**

सीबीएसई बोर्डाचा इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाला असून त्यामध्ये ग्रेगोरियन पब्लिक स्कूल किल्ले येथील विद्यार्थीनी आर्या सुनिल बडे हिने ९७ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर शर्वी अरेकर हिने ९५ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर,तृतीय क्रमांक प्रिशा जैन हिने ९४.६ टक्के पटकावला आहे. विशेष म्हणजे सर्व विद्यार्थ्यांमध्ये तिन्ही मुलींनी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला आहे. आर्या, शर्वी, प्रिशा या गुणी मुलींचे ग्रेगोरियन पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक रेमोल वर्गीस व फादर बेजॉय जॉर्ज व स्कूल मधील सर्व शिक्षक वृंदानी अभिनंदन केले.



## सुधागड तालुक्यात घरांचे नुकसान

### वृद्ध महिला जखमी

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**



सुधागड तालुक्यात सोमवारी (दि.१३) सायंकाळी मुसळधार वादळी पावसामुळे मोठी हानी झाली. येथील वावे गावात सर्वाधिक ५३ घरांचे नुकसान झाले आहे. व एक वृद्ध महिला जखमी झाली. तसेच, मजरे जांभूळपाडा येथील ३ घरांचे नुकसान झाले आहे. याबरोबरच मुळशी ठाकूरवाडी, दहिगाव, वावे तर्फे आसरे, माणगाव बुद्रुक, करचुंडे येथे देखील घरांचे कौल आणि पत्रे फुटल्याची माहिती समोर आली आहे. सोसाट्याचा वारा व पावसामुळे घरांवरील सिमेंटचे पत्रे, कौल, पाईप उडाले. ते एका घरावरुन दुसऱ्या घरावर देखील उडून पडले. तर घरांच्या भिंती कोसळल्या आहेत. यावेळी महसूल प्रशासनाने या नुकसानाचे जलद पंचनामे करुन शासनाने तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्तांनी केली आहे. नायब तहसीलदार भारत फुलपगारे यांनी चिवे गावात घटनास्थळी जाऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी करुन ग्रामस्तांची विचारपूस केली व पंचनाम्याच्या कामाचा आढावा घेतला.

> **वादळीवाऱ्यासह पावसाने झालेल्या घरांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम प्रशासन स्तरावर लागलीच सुरु करण्यात आले आहे. तलाठी व मंडळ अधिकारी यांना पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नुकसानग्रस्तांना जिल्हा स्तरावरून लवकर नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रयत्न करू.**
> **- भारत फुलपगारे, नायब तहसीलदार, पाली-सुधागड**

## गजगे यांचा उपोषणाचा इशारा

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुडमधील सुधा गॅस वितरण व्यवस्थाला प्रधानमंत्री उज्वल योजनेच्या मुदतीत भरलेल्या २७ लाभार्थ्यांचे फॉर्म भरुन सुध्दा या योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे दि.२० मे पासून आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा साकीब गजगे यांनी दिला आहे.

गजगे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनामार्फत महीलांना मोफत गॅस बाटला मिळण्यासाठी शासनाची पी.एम. उज्वला योजना राबविण्यात आलेली होती. या योजनेचा लाभ घेण्याकरता आगरदंडा येथील कॉमन सर्व्हिस सेंटर येथे दि.१२ फेब्रुवारी रोजी १४ लाभार्थ्यांचे तर दि.२६ फेब्रुवारी रोजी १३ लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज गॅस ऑफिसमध्ये जमा केले होते. कार्यालयात या अर्जाबाबत वारंवार विचारपूस केल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत आहेत. तरी, या २७ लाभार्थ्यांचे फॉर्म मुदतीत भरलेले असुन त्यांना शासनाच्या या योजनेचा लाभ न मिळाल्यास कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसेन, असा इशारा निवेदनाद्वारे साकीब मुश्ताक गजगे यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, मुरुड तहसिलदार, पोलीस निरिक्षक यांना सादर करण्यात आल्या आहेत.

> **याबाबत सुधा गॅस वितरण व्यवस्था मुरुड यांच्या कार्यालयाशी आमच्या प्रतिनिधीने संपर्क साधला असता निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे या लाभार्थ्यांना लाभ मिळाला नाही. परंतु, आचारसंहिता संपल्यावर लाभ मिळेल.**
> **- समीर उपाध्ये, मॅनेजर, सुधा गॅस वितरण व्यवस्था, मुरुड-जंजिरा**

## विश्वतेज काटगावकर सर्वप्रथम

**। रसायनी । वार्ताहर ।**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डचा इयत्ता दहावीचा निकाल बोर्डाच्या अधिकृत वेबसाईटवर जाहीर करण्यात आला. चौक येथील श्री स्वामिनारायण गुरुकुल आंतरराष्ट्रीय सीबीएसई स्कूल शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे. यावेळी घवघवीत यश संपादन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले. यामध्ये विश्वतेज काटगावकरने ९५.२० टक्के मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर, मोहित कठारिया ९३.०० टक्के काढून द्वितीय क्रमांक, अनुपम शुक्ला याने ९२.४० टक्के मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे.



## मृत्यूच्या दारातून परतलेल्यांचे मतदान

**। पनवेल । वार्ताहर ।**

दुर्धर आजार व मानसीक स्वास्थ्य हरवल्यामुळे रोडवर भटकत असलेल्या रुग्णांचे पुनर्वसन करण्याचे काम पनवेलमधील सील आश्रमाच्यावतीने केले जाते. अनेकांची मृत्यूच्या दारातून सुटका करण्यात आली आहे. या नागरिकांपैकी ८४ जणांनी मावळ लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला आहे. लोकशाहीच्या उत्सवात सहभागी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या प्रशासनाचे सर्वांनी आभार मानले आहेत.

पनवेल तालुक्यातील वांगणी येथे सील आश्रम मनोरुग्णांवरील उपचार व पुनर्वसनासाठीचे काम करत आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड परिसरात रेल्वे स्टेशन, बस स्टँडसह रोडवर फिरणारे मनोरुग्ण, अजारी रुग्णांना आश्रमात आणून त्यांच्यावर उपचार केले जातात. आतापर्यंत शेकडो नागरिकांना त्यांच्या कुटुंबियांशी भेट घडवून आणली आहे. ज्यांच्या कुटुंबियांचा शोध लागत नाही त्यांचा मृत्यूपर्यंत आश्रमात सांभाळ केला जातो. रायगडच्या जिल्हाअधिकारी पदावर निधी चौधरी तहसीलदार पदावर विजय तळेकर असताना त्यांनी आश्रमातील नागरिकांना आधार कार्ड, मतदान ओळखपत्र मिळवून देण्यासाठी सहकार्य केले होते. लोकसभा निवडणुकीसाठी यातील ८९ नागरिकांचे मतदार यादीमध्ये नाव आले होते.

# उरण नगरपालिकेत बिल्डर लॉबीची चलती

## अधिकारी वर्गाचा खिसा गरम

**। उरण । वार्ताहर ।**




उरण नगरपालिका हद्दीतील बिल्डर लॉबीच्या तालावर बांधकाम विभागातील अधिकारी वर्ग डोलत असल्याने सर्वसामान्य जनतेच्या कामांचा खोळंबा होत आहे. बिल्डर लॉबीपासून अधिकारी वर्गाचा खिसा गरम होत असल्याने त्यांची कामे झटकेपट होत आहेत. याबाबत तक्रारी करूनही अधिकारी वर्ग उडवाउडवीची उत्तरे देऊन आपली जबाबदारी झटकत आहेत. तरी उरण नगरपालिका बांधकाम विभागातील अधिकारी वर्गाच्या मालमत्तेची चौकशी केली तर नक्कीच ते मालामाल असल्याचे उघड होईल.

राज्यात सध्या तिघाडी शासन सुरू असल्याने प्रशासनावर कोणाचाही वचक नसल्याने प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची मुजोरी वाढली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका रखडल्या आहेत. यामुळे या संस्थातून प्रशासनावर कोणीही अंकुश ठेवणारे नसल्याने या संस्थातून संपूर्ण अंदाधुंदी कारभार सुरू आहे.

येथील महसूल विभागात एवढा सावळा गोंधळ निर्माण झाला आहे की कोणताही कर्मचारी अथवा अधिकारी मन मानेल तेव्हा कार्यालयात येतो, आणि जातो. महत्वाचे म्हणजे संबंधित कर्मचारी अथवा अधिकारी मोबाईलवरून निर्णय देत आहेत. किंवा आर्थिक देवाणघेवाण करण्यासाठी कार्यालयाबाहेर भेटणे पसंद करत असल्याचे अधिकृत सूत्रांकडून सांगण्यात आले. उरण नगरपालिका कार्यालयातील बांधकाम विभागातील अधिकारी वर्ग कार्यालयात गेल्यावर खुर्च्या रिकाम्या असल्याचे दिसतात. तर मोबाईलवरून संपर्क साधला असता फोन उचलण्याची तसदी ही घेतली जात नाही.

याउलट बिल्डर लॉबीची कामे ही फोनवरच होत आहेत. काही बिल्डरांनी खोटी कागदपत्रे जोडून परवानगी घेऊन इमारत उभ्या केल्या आहेत. तर, काहींनी १ अधिक २ ची परवानगी घेऊन नियमांची पायमल्ली करून आणखीन मजले वाढविले आहेत. तसेच, नगरपालिका जागेवरही अतिक्रमण करण्यात येत आहे. नव्याने उभ्या रहात असलेल्या इमारतींचा एफएसआय यापूर्वी वापरलेला असूनही त्यांनाही परवानगी देण्यात आल्या आहेत. काही बिल्डर महाशयांनी तर नवीन इमारत उभी करताना पार्किंगसाठीच्या जागेवर गाळे बांधले आहेत, त्यामुळे इमारतीत राहाणाऱ्यांची वाहने मुख्य रस्त्यावर पार्क करून वाहतूक कोंडी केली जात आहे.

या अर्थपूर्ण व्यवहारातून बिल्डर लॉबीचे बगलबच्चे व बांधकाम विभागातील अधिकारी वर्ग यांची गुप्त ठिकाणी भेटीगाठी होऊन कागदोपत्री सर्व ओके असल्याचा रिपोर्ट देऊन वरिष्ठ अधिकारी वर्गाची दिशाभूल करून अधिकारी वर्ग मालामाल झाले आहेत.

# अंध भक्त, पळपुटा नेता

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांनी समोरासमोर येऊन चर्चा करावी असा प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयाचे काही माजी न्यायमूर्ती व इतरांनी दिला आहे. राहुल यांनी त्याला तयारी दर्शवली आहे. मोदी अर्थातच यात सामील होण्याची सुतराम शक्यता नाही. भाजपने या मुद्द्याला बगल देण्याला दिलेले कारण मजेशीर आहे. राहुल हे काही काँग्रेसचे अध्यक्ष किंवा विरोधी पक्षनेते नाहीत. मग मोदींनी त्यांच्याशी चर्चा का करावी असे त्यांनी म्हटले आहे. इकडे महाराष्ट्रात, ही निवडणूक मोदी विरुध्द राहुल अशी आहे असा प्रचार देवेंद्र फडणवीस आणि मंडळी करीत असतात. परवा तेलंगणात खुद्द अमित शाह यांनी तेच सांगितले. एकीकडे बारामतीत सुनेत्रा पवार यांच्यासारख्या दुबळ्या उमेदवार असल्या की ही निवडणूक मोदी विरुध्द राहुल अशी आहे असे सांगायचे आणि गैरसोयीचे वाटले की कोण हे राहुल असे विचारायचे असा हा दुटप्पीपणा आहे. अर्थात, भाजपचा सर्वच व्यवहार खोटारडेपणाचा असतो. त्यामुळे यात नवीन काही नाही. दुसरे म्हणजे जो नेता दहा वर्षे सर्वोच्च पदावर राहून एकदाही पत्रकारांना सामोरे जाण्याची धमक दाखवत नाही त्याच्याकडून काय अपेक्षा करणार? यंदा मोदींनी काही वृत्तपत्रे व वाहिन्यांना मुलाखती दिल्या. पण त्यात त्यांना एकही अडचणीत आणणारा प्रश्न वा उपप्रश्न विचारण्यात आला नाही. किंबहुना, त्यांनी कोणते प्रश्न विचारावेत हेही मोदींच्या कार्यालयाने ठरवून दिले होते. नंतरही या मुलाखतींमध्ये एखादा भाग गैरसोयीचा वाटला तर तो गाळायला लावण्यात आला. मोदींवर टीका करणारे प्रश्नदेखील थेटपणे न विचारता, काँग्रेसचा असा आरोप आहे अशी सुरुवात करून विचारले गेले. त्यामुळे मग मूळ मुद्दा बाजूला पडून काँग्रेसवर टीका करण्याची संधी मोदींना मिळाली.

## बोगस मुलाखती

निवडणूक रोख्यांमधील भ्रष्टाचाराबाबत खरे तर मोदींना फाडून खाल्ले जायला हवे होते. अशा प्रकारची सरबत्ती पूर्वी मनमोहनसिंग किंवा त्याहीपूर्वी अगदी अटलबिहारी इत्यादींवर झालेली आहे. रोख्यांची योजना सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवली. ज्यांच्याविरुध्द इडीच्या केसेस आहेत त्यांच्याकडून कोट्यवधींच्या देणग्या भाजपला मिळाल्या. याबाबत मोदींना थेट सवाल केले जायला हवे होते. भ्रष्टाचारी नेत्यांविरुध्दची चौकशी आम्ही थांबवलेली नाही असा साळसूद दावा मोदी या मुलाखतींमध्ये करताना दिसले. पण मुळात या नेत्यांना भाजपने आपल्यात प्रवेश देऊन मंत्रिपदे का दिली याचा खुलासा मोदींनी कधीच केला नाही. याच रीतीने चीनने केलेले आक्रमण, कोरोना काळात लोकांना दिलेला त्रास, नोटबंदीचे नेमके काय फायदे झाले याबाबत मोदींवर प्रश्नांचा मारा केला जायला हवा होता. पण एकाही मुलाखतीत तो दिसला नाही. असल्या पाळीव पत्रकारांपुढे मर्दुमकी गाजवणारे मोदी खुल्या मैदानात येण्याची हिंमत दाखवू शकणार नाहीत हे उघड आहे. १४० कोटींचे नेतृत्व करणारा नेता इतका डरपोक असावा हे भारतीय जनतेसाठी व आपल्या लोकशाहीसाठी अत्यंत लाजिरवाणे आहे. हेच मोदी यंदा आपल्या दहा वर्षांच्या राजवटीचा हिशेब देण्याऐवजी काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील नसलेल्या गोष्टींचा गवगवा करीत हिंडत आहेत. हिंदूंची संपत्ती किंवा आरक्षण काढून ते मुस्लिमांना देऊ असे या जाहीरनाम्यात कोठेही म्हटलेले नसताना मोदी मात्र ते खोटे अजूनही रेटून सांगत आहेत. अशा वातावरणात खुली चर्चा किंवा संवाद होणे हे तसे कठीणच आहे. अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाच्या दोन उमेदवारांमध्ये अशी जाहीर चर्चा घडवली जाते. ती टीव्ही वाहिन्यांवरून प्रसारित केली जाते. शिवाय, चर्चेचे सूत्रसंचालन नामवंत पत्रकार करतात. अनेकदा या चर्चेतल्या कामगिरीवर जनता उमेदवाराचे मोजमाप करतात. त्याने पारडे फिरल्याचीही उदाहरणे आहेत. भारतात एरवीही हे होणे कठीण आहे. स्वतःला अंधभक्तांचा नेता म्हणून मिरवणाऱ्या मोदींसारख्या नेत्याच्या बाबतीत तर हे अगदीच असंभव आहे.

## मेंदूच्या डॉक्टरचा रोग

या भक्तांमध्ये सामान्य, कमी साक्षर लोक तर आहेतच. पण उच्चशिक्षित, बड्या पगाराच्या नोकऱ्या करणारे, उद्योजक इत्यादीही सामील आहेत. अलिकडेच नगरचे भाजपचे उमेदवार सुजय विखे पाटील यांनी मोदींनी पत्रकार परिषद घ्यावी असा सर्वांचा आग्रह का आहे हेच आपल्याला कळत नाही असे सांगून सर्वांना थक्क केले. भाजपचे प्रवक्ते, मंत्री इत्यादी लोक नेहमी पत्रकारांशी बोलत असतातच. ते पक्षाचे धोरण समजावून सांगण्यासाठी पुरेसे आहे असे विखे यांचे म्हणणे होते. सुजय हे मेंदूवर शस्त्रक्रिया करणारे निष्णात डॉक्टर आहेत. त्यांनी स्वतःच्या मेंदूला इतके पिंजऱ्यात बंदिस्त ठेवावे हे चकित करणारे आहे. मोदी हे सर्वसत्ताधीश आहेत. देशातील सर्वाधिक महत्वाचे निर्णय ते घेत असतात. त्यांनी लोकांना उत्तरे द्यायला बांधील असणे ही लोकशाहीमधील मूलभूत अपेक्षा आहे. मोदींच्या नावाने मते मागणार, कोरोनातील लसीच्या प्रमाणपत्रापासून ते चांद्रयानाच्या प्रक्षेपणापर्यंत त्यांचा संबंध नसतानाही मोदीच मिरवणार आणि जनतेच्या प्रश्नांना उत्तरे मात्र नाही देणार आणि अंधभक्त त्याचेही समर्थन करणार हा सर्वच प्रकार चीड आणणारा आहे. आपला नेता पळपुटा आहे हे या भक्तांच्या कदाचित लक्षात येत असेलही. पण त्याची कबुली अर्थातच ते देऊ शकणार नाहीत. यंदाच्या निवडणूक प्रचारात मोदींनी आपल्या दहा वर्षांच्या राजवटीचा हिशेब देणे अपेक्षित होते. स्मार्ट सिटी, उज्वला योजना, गरिबांसाठीची घरे, घरोघरी पाणी इत्यादींचे काय झाले ते सांगायला हवे होते. मेक इन इंडियाचे तर ते नावदेखील आजकाल घेत नाहीत. तुम्ही विरोधकांना अमुक सवाल करायला हवेत असे ते मुलाखत घेणाऱ्या पत्रकारांना हमखास सांगतात. पण सत्तेत गेली दहा वर्षे मोदी आहेत, विरोधक नव्हेत. विरोधकांच्या घराणेशाहीबाबत ते बोलतात. पण महाराष्ट्रातले त्यांचे किमान दहा उमेदवार कोणत्या ना कोणत्या घराण्यातील आहेत. उत्तर प्रदेशात महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ करणारा ब्रिजभूषण आणि शेतकऱ्यांना अंगावर गाडी घालून मारणाऱ्या मुलाचा बाप अजयकुमार टेनी यांचे तिकिट कापण्याची हिंमत त्यांच्यात नाही. ब्रिजभूषणच्या मुलाला उमेदवारी देण्यात आली आहे. असले लोक काय चर्चा करणार?

विचार

# जनमताचा आरसा दिसतोय

**देशातील सार्वत्रिक निवडणुकींमुळे वातावरण ढवळून निघत असताना हळूहळू जनमताचा कलही समोर येत आहे. त्यानुसार ‘एनडी’च्या विरोधात ‘इंडिया’ आघाडी सरस असल्याचे स्पष्ट होत आहे. विशेषत: शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि तरुण कष्टकरी वर्ग ‘इंडिया’ आघाडीला अनुकूल प्रतिसाद देताना दिसत आहे. मागील दहा वर्षांच्या कालखंडात या वर्गांनी बरेच काही सोसले आहे. सद्यस्थितीतील जनमत त्याचाच आरसा दाखवते.**



सुभाष लांडे

लोकसभा निवडणूक ऐन रंगात असताना एनडीए आघाडी मागे पडत असल्याचे चित्र सध्या बघायला मिळत आहे. आत्तापर्यंत पार पडलेल्या टप्प्यांमधून एनडीए आघाडीच्या विरोधात इंडिया आघाडी सरस ठरत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. निवडणुकीचे उर्वरित टप्पे समोर येतील तसतसे हे अधिक तीव्रतेने जाणवू लागेल. याचे कारण म्हणजे कामगार, सर्वसामान्य शेतकरी, विद्यार्थी, तरुण वर्ग मोदी राजवटीच्या दहा वर्षांच्या कालखंडात त्रस्त आहे. या वर्गांनी या काळात अनेक समस्या सोसल्या आहेत. मोदींची वारेमाप भाषणे आणि आश्वासने ऐकायला मिळाली. भाषणांमधून लोकांना आपलेसे करणे त्यांना चांगले जमले पण, त्यांनी प्रत्यक्ष कृती मात्र करुन दाखवली नाही. खरे तर पूर्वीच्या राजवटीमध्ये अत्यंत वाईट परिस्थिती आपण अनुभवली, असे सांगूनच मोदी सत्तेत आले होते. आम्ही अच्छे दिन आणू, असा त्यांचा नारा होता. मात्र त्यांनी दिलेली कोणतीच आश्वासने पूर्ण होत नसल्याचे आता जनतेला कळून चुकले आहे. एक-दोन नव्हे तर सर्वच जनविभाग हे जाणून आहे. त्यामुळेच आता मोदींची लाट कमी होतीये, असे म्हणण्यास वाव आहे.

सध्या इंडिया आघाडीच्या सभांना मिळणारा लोकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद हे प्रकर्षाने दाखवून देतो. गावोगावी मतदार इंडिया आघाडीच्या सभांना हजेरी लावत आहेत. फारसे परिचयाचे नसतानाही लोक स्वत: इंडिया आघाडीच्या उमेदवारांसाठी पुढाकार घेऊन काम करताना दिसत आहेत. रस्त्यावर येऊन उमेदवारांना समर्थन देत आहेत. पूर्वी तरी सभेला उपस्थित राहण्यासाठी वाहनाची सोय करावी, आपल्याला काही तरी मदत करावी अशी लोकांची अपेक्षा दिसायची. मात्र आता इंडिया आघाडीच्या बाजुने लोक स्वयंस्फुर्तीने सभांमध्ये सहभागी होत आहेत. ग्रामीण भागातील शेतकरीवर्गानेही निवडणुकीचा प्रचार जवळपास आपल्या हाती घेतल्यासारखी परिस्थिती आहे. आम्ही महाराष्ट्र फिरलो. प्रत्येक ठिकाणी असेच चित्र दिसते. काही अपवादात्मक मतदारसंघ वगळता अन्य ठिकाणी मतदारांनी निवडणूक हातात घेतली आहे. कुठल्याही परिस्थितीत मोदींची राजवट पुन्हा नको असल्याची भावना तयार झाली आहे. ही भावनाच प्रचाराच्या वातावरणात स्पष्ट दिसून येत आहे.

२०१४ आणि २०१९ मध्ये मोदींच्या बाजूने वातावरण होते. आता मात्र त्याच्या अगदी विरुद्ध वातावरण बघायला मिळते. मोदींनी वक्तव्ये केली, त्याच्या बरोबर उलटे घडत असल्याचे लोकांना जाणवत आहे. आताच्या प्रचारात सर्जिकल स्ट्राईक, राममंदिराची उभारणी, लसीकरणातील भारताचे योगदान, काश्मीरमधील ३७० कलम हटवणे आदी मुद्द्यांचे औचित्य उरलेले नाही. याचे कारण म्हणजे हे सगळे मुद्दे त्या त्या काळात भावनिक केले गेले. मात्र त्यातून सामान्य नागरिकांना फारसे काही मिळाले नाही वा आता त्यांचा फारसा संबंध उरलेला नाही. भावनिक मुद्दे सोडूनही लोकांच्या काही समस्या असतात. त्यांचे प्रश्न असतात. मात्र मधल्या काळात अशा सर्वसामान्य समस्या सुटण्याऐवजी वाढतच गेल्या. म्हणूनच आता लोकांमध्ये असंतोष दिसतो आहे. अलिकडेच दोन समुहांमध्ये तेढ वाढवण्याचे भाजपाचे मनसुबे उघड झाले. मात्र आता लोकांना हे पटत नाही. धर्म आणि जातीच्या नावे लोकांना संभ्रमित करायचे आणि मते घ्यायची, ही आता सोपी गोष्ट राहिलेली नाही. आपली लोकशाही जुनी आणि जाणती असल्यामुळे इथे एका विशिष्ट राजकीय पक्षाची अधिक काळ सत्ता खपवून घेतली जात नाही. या काळात चुकलेल्या गोष्टींवर चर्चा होऊन त्याविरोधात वातावरण निर्माण होते. त्यामुळेच भाजपा आणि मित्रपक्ष त्याच त्याच गोष्टी पुन्हा सांगायला लागले तर ते लोकांना पटणे अशक्य आहे. म्हणूनच हा बदल लक्षणीय म्हणावा लागेल.

आत्तापर्यंतच्या टप्प्यापर्यंत नेतेमंडळींनी आपल्या भाषणातून राजकारणाचा घसरता स्तर दाखवून दिला, असे खेदाने म्हणावेसे वाटते. पूर्वी भाजपा भ्रष्टाचाराविरोधात बोलत असे, मात्र आता या तथाकथित दलदलीत अडकलेले लोकच त्यांनी बरोबर घेतले आहेत. ते घराणेशाहीबद्दल बोलत होते. मात्र घराणेशाही त्यांच्या आघाडीतही कमी नाही. इतर राजकीय पक्षांमधील नेतेमंडळींबद्दल एकेरीत वा चुकीच्या अर्थाने उल्लेख करण्याची बाबही लोकांना न पटणारी आहे. तुम्ही आमच्यासाठी काय करु शकाल, हा जनतेचा रोखठोक प्रश्न आहे. मात्र सध्या विरोधकांची निंदानालस्ती आणि वैयक्तिक टीकेमध्ये प्रचार अडकला आहे. खरे तर पंतप्रधानपदावर असणाऱ्या व्यक्तीने गेल्या कार्यकाळात आपण काय करु शकलो आणि पुढे काय करणार, याविषयीची स्पष्टता देणे अपेक्षित असते. त्याची गरजही आहे. मात्र त्याऐवजी ते जुनेच तुणतुणे वाजवत राहिले तर काय होणार? थोडक्यात, आता लोकांना मोदींची भाषा, त्यांचे विचार पचनी पडेनासे झाले आहेत.

भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांमधील नेतेमंडळींची महिलांविषयीची भाषाही फारशी चांगली नाही. मुस्लीम समाज वा अल्पसंख्याकांबद्दल त्यांच्या बोलण्यात उघड उघड निंदा दिसते. दलितांबद्दलची त्यांची भूमिकाही स्पष्टपणे मांडलेली बघायला मिळत नाही. थोडक्यात, भाजपा वा आरएसएसची सामान्य लोकांच्या बाजूची भूमिकाच नाही. हे चित्र दिसत असल्यामुळे प्रसिद्धीची लाट विरताना दिसत आहे. या भीतीमुळेच कोणतेही नवीन मुद्दे न आणता जुने मुद्दे उगाळण्यात ते वेळ घालवताना दिसत आहेत. खरे सांगायचे तर आज सर्वसामान्य लोकांमध्ये ‘मोदी की गॅरेंटी’ हा चेष्टेचा विषय झाला आहे. त्यामुळेच ‘अबकी बार ४०० पार’ हा नारा फलद्रुप होणे अवघड आहे. वस्तुत: कोणत्याही राजकीय पक्षाने इतक्या मोठ्या बहुमताची शक्यता व्यक्त करु नये. एवढी मते मिळवण्यासाठी एव्हीएम हॅकिंग करतात की काय, अशी शंका आता लोकांच्या मनी येऊ लागली आहे. कारण आधी उल्लेख केल्याप्रमाणे कोणताही पक्ष इतक्या घसघशीत यशाचे आश्वासन देऊ शकत नाही. म्हणूनच आता हा शंकेचा विषयही बनला आहे. थोडक्यात, व्यवहाराबद्दल मतमतांतरे असल्यामुळे लोक त्यांच्या विरोधात जास्त काम केले पाहिजे, असे म्हणू लागले आहेत. त्यांच्याविरोधी मतदान घडवून आणण्यासाठी अनेकांनी कंबर कसली आहे. या भावनेची दखलही घ्यायला हवी.

दर निवडणुकांमध्ये पैशाच्या गैरवापराचा मुद्दा ऐरणीवर येतोच. मुख्य म्हणजे बक्कळ पैसे असणारा पक्षच त्याचा गैरवापर करु शकतो. हे चित्रही सध्या बघायला मिळत आहे. निवडणूक यंत्रणेचा एकूण खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. अलिकडेच काँग्रेसच्या एका उमेदवाराने निवडणूक प्रचारासाठी पैसे नसल्याच्या कारणास्तव निवडणुकीतून माघार घेतली. या उमेदवाराने काँग्रेस पक्षाकडे पैशाची मागणी केली होती. मात्र त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. म्हणणेच निवडणुकीत पैशाचा प्रचंड वापर हा कळीचा मुद्दा आहेच. अलिकडच्या मोठ्या शहरांमधील एका सभेचा खर्च काही कोटींच्या घरात जात असल्याच्या बातम्या आपण ऐकतोच आहोत. या पार्श्वभूमीवर आपल्याकडे निवडणुकीसाठी पैसे नसल्याने काँग्रेसने आधीच जाहीर केले होते. त्यातच मध्यंतरी इलेक्ट्रोरल बाँड्सचे प्रकरण चर्चेत आले. यातून भाजपकडे प्रचंड पैसा असल्याचे सत्यही जनतेसमोर आले आहे. काँग्रेसकडेही या मार्गाने पैसा आला असला तरी तुलनेत कमी आहे. मुख्य म्हणजे डाव्या पक्षांनी सुरूवातीपासूनच इलेक्ट्रोरल बाँड्सना विरोध केला आहे. त्यामुळे त्यांच्याकडे या मार्गाने पैसे येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ही विषमताही जनतेच्या नजरेतून न सुटणारी आहे.

असे असताना पुढचे दिवस देशासाठी काळजी घेण्याचे आहेत. इंडिया आघाडीपुढे संविधान वाचवण्याचे मोठे आव्हान आहे. देश वाचवणे हा अग्रक्रमाचा मुद्दा आहे कारण संविधान वाचले तरच आपण बाकीच्या समस्यांचा मुकाबला करु शकतो. याचाच आधार घेत आता खुद्द मोदीदेखील आम्ही कोणत्याही प्रकारे संविधानाला धोका पोहोचवणार नसल्याचे बोलू लागले आहेत. आम्ही संविधान वाचवू, असे सांगू लागले आहेत. हा आपल्या हुकूमशाही राजवटीप्रती लोकांच्या मनातील राग ओळखून प्रचारात बदल करण्याचाच एक प्रकार आहे. खरे तर त्यांनीच सगळ्या संवैधानिक संस्थांवर कब्जा केला. घटनेत दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला. ४०० पार गेलो तर आम्ही घटनेत दुरुस्ती करु, असे ते आणि त्यांचे नेते स्पष्ट म्हणत होते. मात्र बदलती समिकरणे त्यांना शांत राहण्यास भाग पाडत आहेत. ते बघता आगामी निकाल काय असेल हे बघणे औत्सुक्याचे ठरणार, यात शंका नाही.

आजकाल

# कर्मवीरांना मनापासून नमन!

संजय कोल्हटकर

आठवण माझ्या पत्नीच्या आजीची आहे.

त्यांचे नाव होते उमाबाई कुलकर्णी. वास्तव्य पंढरपूर. पती त्या काळात रेल्वेत नोकरीला. त्या काळानुसार बालवयातच विवाह झालेला. पदरी एक मुलगा. सासरही पंढरपूरात अचानक पती निधन झाले, आणि जगायचे कसे हाच प्रश्न उभा राहिला. तसे सासरचे लोक संभाळत होते. पण आजींचे मन तिथे रमेना. त्या माहेरी आल्या. सासरशी संबंध होते. पण वास्तव्य पंढरपूरात आजीबाईंचे शिक्षण सातवीपर्यंत झाले होते. त्यांचे दीर पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी. त्यानी आजींच्या भावी जीवनाचा विचार करून त्याना सातारच्या जिजामाता अध्यापिका विद्यालयात घातले. रहायची सोयही विद्यालयाच्या वसतीगृहात केलेली. वसतीगृहात आमच्या आजीबाईंसारख्याच काहीना काही समस्यानी गांजलेल्या महिलाही निवासी, संस्था रयत शिक्षण संस्थेची.

आमच्या आजीबाईना संधीवाताचा थोडा त्रास. वसतीगृहाच्या व्यवस्थेवर कर्मवीरांचे बारीक लक्ष. येवढेच नव्हे तर तिथल्या प्रत्येक निवासींच्या अडीअडचणी आणि समस्यांची माहितीही. आमच्या आजीबाईना संधीवाताचा त्रास आहे हे कर्मवीराना माहित होते. रोज या वसतीगृहातून एक चक्कर मारून जाणे हा कर्मवीरांचा नीत्यक्रम.

रात्रीची जेवणे झाल्यावर कर्मवीर एक चक्कर मारून जायचे. माहितीनुसार सूचना, आदेशही द्यायचे. आमच्या आजीबाईना संधीवात आहे हे त्याना माहित. जाताना म्हणायचे उमे अंगावर घोंगडे घेऊन झोप. थंडीचा त्रास होणार नाही. ही आठवण आमच्या आजीबाई अनेकदा सांगयच्या. कर्मवीरांचे हे आगळेपण आणि मोठपणही.

आजकाल शिक्षण हा व्यवसाय बनला आहे. गल्लीबोळातून शिक्षण सम्राटांचे वारेमाप पिक काँग्रेस गवतासारखे फोफावल्याचे चित्र अवतीभोवती दिसत आहे. साक्षरतेच्या वाढत्या प्रसाराबरोबर शहरापासून ग्रामीण भागापर्यंत सर्वत्र दर्जेदार नसले तरी शिक्षणाचे लोण पोचले आहे. प्राधान्याने संगणक युगाच्या प्रारंभापासून व्यावसायिक कौशल्यांचे ज्ञान असणार्यांची संख्या काही काळापुरती तरी अमाप वाढल्याने गलीबोळातून या संधीचा फायदा उठवत स्वतःचे आणि सग्यासोयऱ्यांचे खिसे भरणार्या शिक्षण सम्राटांची मांदियाळी झाली आहे. यात या शिक्षण सम्राटांच्या परिस्थितीत नेत्रदिपक बदल घडला असला तरी प्रत्यक्ष शिक्षणाच्या दर्जाचे काय हा प्रश्न आजही अनुत्तरीत आहे.

कधी काळी महाराष्ट्रात विशिष्ट जाती जमातीतलेच नाही तर तळागाळातले साक्षर व्हावेत म्हणून स्वतःच्या जीवनाचा हो’ महायज्ञ या महापुरूषानी महाराष्ट्रात आणि देशात सर्वसामान्याना साक्षर आणि शिक्षित करण्याचे ध्यैय्य डोळ्यपुढे ठेवून आपले जीवन खर्ची घातले होते.

माझे बँक खाते मजबूत कसे होईल या विद्यमान शिक्षणसम्राटाची काळजी त्या महापुरूषांना कधी लागली नाही तर माझे सर्वस्व पणाला लागले तरी बेहत्तर पण समाज साक्षर झाला पाहिजे या तळमळीने त्या महापुरूषांनी आपल्या जीवनाचा यज्ञ मांडला होता.

त्यात अग्रभागी कर्मवीर भाऊराव पाटील तथा अण्णांचा समावेश करावा लागेल. शिक्षण हे व्रत, तप आणि यज्ञ मानून कर्मवीर अहोरात्र झगडत राहिले. निसंग योगी आणि तपस्वी कसा असावा. त्याने विजनवासात जाऊन बसले तरच तो योगी होत नाही तर कर्मवीरांसारखा समाजात वावरूनही आपली निसंग वृत्ती दाखवत असतो. कर्मवीरानी आपल्या मुलाला आसाहेब पाटील यांना पत्र लिहून त्यांनी संस्थेवर भार बनून राहू नये कारण त्यामुले रयतवर विनाकारण आर्थिक बोजा पडेल तेंव्हा स्वतःसाठी अन्यत्र नोकरी बघावी असे आग्रहपूर्वक पत्र लिहून कळवले होते. वंशपरंपरेने संस्थानिक या कल्पनेला त्यांनी या पत्रातून विरोध केला होता. आजकाल मुलगाच काय जावई, भाचे पुतणे यांची आणि त्यांच्या पोराबालांची ७ जन्माची सोय कशी लावता येईल असा विचार करणार्यांच्या जमान्यातकर्मवीर म्हणूनच वेगळे ठरतात. आता महापुरुषाची त्यागी आणि निर्मम मानसिकता मुलाबालात येत नाही हे तर खरेच. निवृत्तीचे जीवन जगत असताना आता मला चार चाकी गाडीची गरज नाही ती परत घेऊन जावी आणि रयतच्या कामासाठी तिचा वापर करावा अशी सूचना करायला आपल्या कामावर प्रखर निष्टा, आणि त्यागी वृत्ती लागते ती असते म्हणूनच भाऊराव पाटीलकर्मवीर होतात. नाहीतर शक्यतो लाल दिव्याची किमान पिवळ्या दिव्याची ती नसेल तर किमान सरकारी खर्चातून स्वतः आणि बायकापोरांना चंगळ करायला मी’लाती असे मानणाऱ्यांची आणि मार्तजनिक पैया तरबाट मी’ ळावी असे मानणार्यांची आणि सार्वजनिक पैसा बरबाद करणार्यांची संख्या कमी नाही या वेगळेपणाने कर्मवीर अमर होतात अन्यथा कितीएक ते जन्म’ले आणि मेले अशांची संख्या वारेमाप.

लोकसंसद

## महाराष्ट्रात मान्सून वेळेवर

सध्या अंदमानात मान्सूनच्या हालचाली वेगात सुरु झाल्या आहेत. अनुकूल स्थितीमुळे वाऱ्यांचा वेग वाढला आहे. मान्सून १९ मे पूर्वीच अंदमानात व १ जूनच्या आधी केरळ मध्ये दाखल होईल. अंदमान व निकोबार बेटावर पाच दिवस पडत असलेला पाऊस या स्थितीवरून मान्सूनची वर्दी हवामान खात्याने दिली आहे. साहजिकच महाराष्ट्रात सुद्धा तो वेळेवर दाखल होण्याची चिन्हे आहेत. भारतीय शेतीच्या दृष्टीने मान्सून च्या पावसाला अतिशय महत्व आहे. देशातील बहुतांशी शेती या मान्सून वर अवलंबून आहे. मान्सूनचा पाऊस योग्य रीतीने झाल्यास त्याचा परिणाम अनेक गोष्टीवर होत असतो. पावसामुळे धरणात पाणी साठण्यास सुरुवात होते. शेतीसाठी पाणी पुरवठा होऊ शकतो. धान्य, भाजीपाला, इत्यादींचे भाव आटोक्यात राहण्यास मदत होते. मागील वर्षी पाऊस सरासरीच्या कमी झाल्यामुळे अनेक ठिकाणी धरणे भरली नाहीत. त्यामुळे शेतीसाठी व पिण्यासाठी पाण्याची आता टंचाई आहे. प्रचंड उकाड्यामुळे लोक हैराण झाले आहात. त्यामुळे सर्वजण पावसाची वाट आतुरतेने पाहत आहेत. अलिकडे काही वर्षे पावसाळा उशिरा चालू होण्याचा प्रघात पडला आहे. त्याला यंदा ब्रेक मिळेल असा अंदाज आहे. या हवामान अंदाजानुसार सर्वजण जसे शेतकरी, व्यापारी, मध्यमवर्गीय सारे आनंदी आहेत हेच खरे.

- शांताराम वाघ, पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१६ मे**

**१८२४:-** गणिताचे गाढे अभ्यासक, ज्योतिषशास्त्र आणि पंचांग यांसह अनेक विषयांत रस असलेले विज्ञानविषयक लेखक केरो लक्ष्मण छत्रे यांचा जन्म. केरोपंतानी फ्रेंच व इंग्रजी ज्योतिषग्रंथांच्या आधारे ‘ग्रहसाधनांची कोष्टके’ आणि ‘पंचांगसाधन कोष्टके’ हे ग्रंथ लिहिले. ‘हवेवरील ग्रंथ’, ‘पर्जन्यसंबंधी व्याख्यान’, ‘पदार्थविज्ञान शास्त्र’, ‘अंक गणित’, ‘भूमापन’ या पुस्तकांचे लेखनही त्यांनी मराठीत केले. **१८६४:-** प्रवासवर्णनकार, बडोद्याच्या श्रीसयाजी पुस्तकालयाचे संस्थापक आणि श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे बंधू काशीराव गायकवाड यांचा जन्म. त्यांची ‘नेपाळचा प्रवास’, ‘माझी तीर्थयात्रा’ ही प्रवासवर्णने प्रसिध्द झाली. तसेच ‘स्वातंत्र्य’, ‘विवाहाच्या ऐतिहासिक पध्दती’ ही व्याख्याने व मराठी, गुजराथी, हिंदीतील प्राचीन काव्यवेच्यांचे ‘भजनकुसूममाला’ व ‘भजनसुधासार’ इ. पुस्तके प्रकाशित. **१८७४:-** अनुवादक गोविंद मंगेश कालेलकर यांचा जन्म. ‘मुंबई इलाख्यातील जाती’ व ‘लौकिक दंतकथा’ हा दोन अनुवादीत पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९२४:-** लेखक, चरित्रकार, संपादक मधुकर श्रीधर दीक्षित यांचा जन्म. अनेक वृत्तपत्रे, मासिके यांतून ग्रंथपरीक्षणे करणाऱ्या दीक्षित यांनी ‘भारतरत्न नेहरु’, ‘पंतप्रधान शास्त्री’, ‘सत्तावन्नचे सप्तर्षी’, ‘तेजस्वी तारका’ या चरित्रपुस्तकांसह ‘एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र’, ‘साहित्यिक सांगाती’, ‘महाराष्ट्र साहित्य परिषद’ आणि ‘पुणे नगर वामन मंदिर-दीडशे वर्षाचा इतिहास’ आदी ग्रंथ लिहिले आहेत. **१९३०:-** साहित्यिक प्रा. अनंत दामोदर मनोहर यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत दहाहून अधिक कादंबऱ्या, ‘गलोल’ हा लेखसंग्रह, तसेच एकांकिका, कथासंग्रह आणि ‘इमान’ हा आत्मचरित्राचा अनुवाद अशी साहित्य संपदा. **१९३६:-** लेखिका मंदाकिनी गोगटे यांचा जन्म. ह्यांचा ‘माझं नकटं नाक’ ह्या कथासंग्रहासह ‘बागेश्री’ या दिवाळी अंकाचे संपादन त्यांनी केले आहे. **१९४५:-** अर्थतज्ञ, चरित्रकार, इतिहासलेखक, राज्यघटना शास्त्रज्ञ आणि ब्राम्हणेतर चळवळीचे प्रमुख नेते, श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांचे चरित्रकार अण्णासाहेब बाबाजी लठ्ठे यांचे निधन. अण्णासाहेबांनी ‘कोल्हापुरच्या राज्याचा इतिहास’ व ‘हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याचा उदय’ ही इतिहास विषयक तसेच ‘जगातील फेडरेल राजव्यवस्था’ आणि ‘माझ्या विलायतीच्या आठवणी’ अशी पुस्तके प्रसिध्द. **१९४७:-** लेखक, कवी ज्ञानेश्वर गणपत चौधरी यांचा जन्म. ह्यांनी ‘श्री अमृतनाथ स्वामी चरित्रासह’, ‘चंदनाची फुले’ हा ललित लेखसंग्रह आणि ‘ज्ञानबोध’ हे काव्य लिहिले आहे. **१९५८:-** कवयित्री प्रतिमा गोपाळकृष्ण कामत (प्रतिमा पै) यांचा जन्म. ‘काजळराज’, ‘जिनिया’ हे काव्य त्यांचे प्रकाशित झाले आहे. **१९६०:-** कवी आणि काव्य लिहिणे, वाचन करणे, कवितांचे कात्रणे ५० हजाराचे वर, संत, समाजसेवक, साहित्यिक प्रबोधनकार, शिक्षणतज्ञ, शिक्षण संबंधित लेख, देशभक्ती गीते इत्यादी माहिती संकलित, कथा, कादंबरी, नाटके, काव्यसंग्रह, निबंधपुस्तके संग्रहित करण्याची आवड असणारे शालिग्राम चहाडू वाडे यांचा जन्म. त्यांचे ‘स्वातंत्र्याचा विश्वासघात’, ‘वांझोटी वाट’, ‘झाली बोंबाबोंब’, ‘एक रात्र पावसाची’ हे चार काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. **१९६५:-** ‘श्री गजानन महाराज, श्री गुप्ते गजानन महाराज, श्री माणिक प्रभु, श्री माधवराज महार-ाज, श्री गुलाबराव महाराज’ आदी सत्पुरुषांची चरित्रे लिहिणारे चरित्रकार दत्तात्रेय महादेव खेर यांचा जन्म. याशिवाय खेर यांनी शेक्सपिअरच्या ‘किंग लियर’ आणि ‘टू जंटलमेन ऑफ व्हेरोना’ या नाटकांचा गोष्टीरुप अनुवाद केला आहे. **१९६६:-** कवी, नाटककार, टीकाकार यशवंत खंडेराव कुलकर्णी यांचे निधन. त्यांच्या स्फुट कवितांचे दोन संग्रह तसेच ‘एकच हिंदुस्थान’ आणि ‘नरवीर तानाजी’ या दीर्घकाव्याचे संग्रह प्रकाशित झाले हो-ते. संत मीराबाईच्या जीवनावर ‘संगीत साध्वीरत्न’ हे नाटक व काही एकांकिकाही त्यांनी लिहिल्या होत्या. **१९६९:-** ‘गप्पाष्टक’ कार म्हणून प्रसिध्द असलेले व्याख्याते व लेखक संजय उपाध्ये यांचा जन्म. यांनी ‘मन करा रे प्रसन्न’ ही जीवन जगण्याची कला शिकवणारी व्याख्यानमाला. ‘ऐनवेळी’, ‘विनायक विजय’, ‘वास्तव आदी पुस्तके’ हे साहित्य आणि ‘इंडेमाऊची गाणी’, ‘गप्पाष्टक’ (भाग १ व २) इ.साहित्य प्रकाशित. **१९९४:-** लेखक, समीक्षक माधव मनोहर यांचे निधन. ‘अन्नदान एक आणि दोन’, ‘एका रात्रीची गोष्ट’ या त्यांच्या अनुवादीत कांदबऱ्या. **१९९९:-** ललित लेखक, समीक्षक, व्यासंगी ग्रंथसंपादक महादेव नामदेव अदवंत यांचे निधन. लेखनाची सुरुवात त्यांनी लघुकतेने केली. ‘संजीवनी’, ‘माणुसकीचा धर्म’ हे त्यांचे सुरुवातीचे लघुकथा संग्रह. त्यांच्या विनोदी कथांचा संग्रह काही गंभीर, काही विरोधी या नावाने प्रसिध्द. याशिवाय मनाचे संकल्प, मनाची मुशाफिरी, पैंजण हे सहा शाहीरांच्या निवडक कवितांचे संकलन, ‘मोरोपंताचं विराटपर्व, ज्ञानेश्वरी अध्यायचे संपादन, मराठीतील काही कथाकारमधून दहा कथा लेखकांच्या कथांचा अभ्यास तसेच हरिभाऊ विविध लेख आणि कवी विनायकांच्या कवितांचे संपादनही त्यांनी केले. **२०००:-** बालसाहित्यिक मा. गो. काटकर यांचे निधन. **२०१०:-** ज्येष्ठ लेखिका मंदाकिनी गोगटे यांचे निधन. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार लाभला आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल


# महापारेषणच्या सबस्टेशनमध्ये अग्नितांडव

**। सुकेळी । वार्ताहर ।**

**रोहा तालुक्यातील नागोठण्याजवळील असलेल्या ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील कानसई येथील ४०० केव्ही क्षमता असलेल्या सबस्टेशनमध्ये आग लागल्याचा प्रकार घडला. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले. त्यामुळे सबस्टेशनमध्ये अग्नितांडव पाहावयास मिळाले. ही घटना मंगळवारी (दि.१४) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घडली.**

## लाखो रुपयांचे नुकसान

यावेळी अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांना ही आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावे लागले. या आगीत सबस्टेशनमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, आग कशामुळे लागली याचे कारण समजू शकले नाही.

याबाबतीत मिळालेल्या माहितीनुसार, नागोठणेजवळील कानसई येथील महापारेषणच्या ४०० केव्ही सबस्टेशनमध्ये मंगळवारी अचानक आग लागल्याचे येथील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला; परंतु आग इतकी भयंकर होती की काही क्षणार्धातच आगीने रौद्ररूप धारण केले. तात्काळ सुकेळी येथील जिंदाल कंपनीच्या अग्निशामक दलाला पाचारण केल्यानंतर काही वेळातच आमडोशी येथील सुप्रीम पेट्रोकेम, नागोठणे येथील रिलायन्स तसेच धाटाव एमआयडीसी यांच्या अग्निशामक दलाच्या गाड्या कर्मचाऱ्यांसह दाखल झाल्या. या चारही कंपनीच्या अग्निशामक दलाच्या कार्यकर्त्यांनी दोन ते तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण आणण्यात यश मिळाले. या आगीमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या घटनेसंदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी कानसई सबस्टेशनमधील अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही. त्यामुळे आग कशामुळे लागली याचे कारण मात्र समजू शकले नाही.



(छायाचित्र : दिनेश ठमके)

## कोलाड येथे अखंड नामयज्ञ सोहळा

**। कोलाड । वार्ताहर।**

कोलाड विभागीय वारकरी संप्रदायतर्फे शुक्रवार, दि.१७ ते शनिवार, दि.१८ मेपर्यंत द.ग.तटकरे माध्यमिक विद्यालय कोलाड हायस्कूल कोलाड येथील प्रांगणात अखंड नामयज्ञ सोहळा आयोजित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ७ ते ८ सर्व मंगळविधी, सकाळी ९ ते १२ ज्ञानेश्वरीचे पारायण, दुपारी १२ ते २ महाप्रसाद, सायं.५ ते ६.३० सामुदायिक हरिपाठ, सायं.६.४५ ते ९ हरिकीर्तन, रात्री ११ नंतर हरिजागरण होईल.

शुक्रवारी रोजी दुपारी १२ ते २ वा. श्रीरंग गणेश दिघे यांच्या सौजन्याने महाप्रसाद, सायं. ६.४५ ते ९.०० वा.वारकरी भूषण चैतन्य महाराज नाशिककर यांचे कीर्तन प्रीतम पाटील (रोहा तालुका महिला अध्यक्षा राष्ट्रवादी काँग्रेस) यांच्या सौजन्याने, रात्री ९ ते ११ महाप्रसाद कोलाड विभाग वारकरी संप्रदाय यांच्या सौजन्याने, तसेच शनिवारी सकाळी १० ते १२ भाषाप्रभू जगन्नाथ महाराज पाटील (शहापूर ठाणे) यांचे काल्याचे कीर्तन राम महाराज आंबेकर (पुई कॉलनी) यांच्या सौजन्याने, दुपारी १२ नंतर कै. सुनंदा महाडिक व कै. सीताराम महाडिक यांच्या स्मरणार्थ यांचे नातू कौस्तुभ, सुभम, इंद्रायणी (चिंचवली) यांच्या सौजन्याने महाप्रसाद, सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहा तालुका वारकरी संप्रदाय सर्व पंचक्रोशीतील वारकरी यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. हा कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोलाड विभाग वारकरी संप्रदायाचे कार्यकारी मंडळ व सर्व सदस्य मेहनत घेत आहेत.

## घरफोडीमुळे गावी गेलेले शिक्षक चिंतेत

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

गेल्या अनेक वर्षांपासून भुरटे चोर बंद असलेले ब्लॉक घरे फोडून किमती ऐवज पळविणे, हाती काहीच लागले नाही तर सामानाची नासधूस करणे असे प्रकार घडत आहेत. विशेषतः दिवाळी आणि मे महिन्यात मोठ्या सुट्ट्या असतात, अशावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी नोकरीनिमित्त रायगडमध्ये आलेले आहेत, ते दीर्घ सुट्टीत आपल्या पुणे, सातारा, बार्शी, बीड, मालेगाव, नाशिक, चंद्रपूर, पालघर तसेच अन्य ठिकाणी जातात. मात्र, या संधीचा फायदा भुरटे चोर घेऊन बंद असलेली घर फोडून किमती ऐवज सामान घेऊन पोबारा करतात. यावर्षी ७ मे रोजी लोकसभेच्या निवडणुका पार पडल्यानंतर शिक्षकवर्ग आपल्या गावाकडे गेला. मात्र, घरफोडीच्या बातम्या वाचून किंवा ऐकून त्यांच्यामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# माथेरानमध्ये वळीवाच्या पावसाने बत्ती गुल

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान मध्ये मागील दोन दिवस वळीवाच्या पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसाने येथील वातावरणात गारवा निर्माण केला. मात्र, या पावसाने माथेरान शहरातील वीजपुरवठा खंडित झाला असून, माथेरानची बत्ती गुल झाली आहे. स्थानिकांसह येथे आलेल्या पर्यटकांनासुद्धा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

माथेरान शहरात मागील दोन-तीन दिवसांपासून दुपारनंतर ढगाळ वातावरण निर्माण होत असून, येथे सोमवारी मतदानाच्या दिवशी दुपारनंतर सोसाट्याचा वारा वाहू लागला होता. त्यानंतर तासाभरातच येथील वातावरणात गारवा जाणवू लागला आणि अचानक पावसाने हजेरी लावली. मंगळवारीदेखील दुपारनंतर वादळी वारा आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाने हजेरी लावली. यामध्ये जोरदार गारांचा पाऊस पडला.




गारांच्या पावसामुळे वातावरणात कमालीचा गारवा निर्माण झाला होता. मात्र, या पावसामुळे स्थानिकांसह येथे पर्यटकांचीसुद्धा चांगलीच धावपळ उडाली. जवळपास अर्धा तास पडलेल्या पावसामुळे मंगळवारी वीजपुरवठादेखील खंडित झाला होता. संपूर्ण रात्रभर माथेरान शहराची बत्ती गुल झाली होती. बुधवारी सकाळी थोड्या वेळासाठी वीजपुरवठा सुरू करण्यात आला होता. तद्नंतर कोणतीही पूर्वसूचना न देता माथेरान शहराचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. असाच वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने याचा परिणाम येथे माथेरान शहराच्या पाणी पुरवठ्यावरसुद्धा होत आहे.

सध्या माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांची चांगलीच रेलचेल आहे. मात्र, वारंवार खंडित होत असलेला वीजपुरवठा आणि यामुळे पाणीपुरवठ्याचे कोलमडलेले नियोजन यामुळे स्थानिकांसह आलेल्या पर्यटकांनादेखील याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वीज आणि पाणी या मुख्य सुविधांच्या अभावामुळे येथील हॉटेल व्यावसायिक आणि लॉजधारकांना येथे पर्यटकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

> आत्ता कुठे माथेरानमध्ये पर्यटक वाढू लागले आहेत. परंतु, लाईट गेल्यामुळे दोन दिवस पाणीदेखील आले नाही. महावितरण अधिकाऱ्यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला, पण संपर्क होऊ शकला नाही. पर्यटक माथेरानमध्ये मोठ्या प्रमाणावर दाखल होत आहेत. लाईट आणि पाणी नसल्याने पर्यटकांची सोय करता येत नाही.
> – निलेश परदेशी, लॉजधारक

पान १ वरुन

## भाजीचा टेम्पो उलटून एक ठार, तीन जखमी

बेपर्वाईने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून तीव्र चढाच्या वळणावर आल्यानंतर त्याचा गाडीवरील ताबा सुटून टेम्पो कलंडून अपघात घडला. या अपघातात आनंदा अंकुश कारंडे (४५, सोमजाईनगर वाई, जि.सातारा) यांचा जागीच मृत्यू झाला तर तुषार लालसिंग भिलारे (२८, रा. सोमर्डी, ता. जावळी), राजेंद्र बबन गाडवे (५५, रा. गाडवेवाडी, ता. वाई), सुमन अशोक जमदाडे (५०, रा. आधार हॉस्पिटल जवळ हनुमान नगर, वाई) असे तिघेजण जखमी झाले.

या अपघाताबाबत पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलीस नाईक घुले हे पोलीस निरीक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

पोलादपूर शहरातील कविंद्र परमानंद स्मारकाच्या उद्घाटनावेळी तत्कालीन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते भूमीपूजन होऊन पूर्णत्वास गेलेल्या काटेतळी नागाव विन्हेरे रस्त्याचे रूंदीकरण होऊन मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाला करंजाडी रेल्वे स्थानकापर्यंत जोडण्यासाठी प्रयत्न होण्याची मागणी अनेक वर्षांपासून पोलादपूर तालुकावासियांकडून होत आहे. मात्र, या मागणीकडे सपशेल दुर्लक्ष चालले होते. दरम्यान, मंगळवारी झालेल्या अपघाताने पोलादपूर काटेतळी रस्ता पुन्हा चर्चेत आला आहे.

## अद्याप बचावकार्य सुरूच

ढिगाऱ्याखाली आणखी ३० ते ४० जण असल्याची शक्यता आहे. तसे घडल्यास या दुर्घटनेतील मृतांच्या आकड्यात मोठी वाढ होऊ शकते. आतापर्यंत होर्डिंगचा ५० टक्के ढिगारा बाजूला करण्यात आला आहे. पूर्ण ढिगारा बाजूला करण्यासाठी आणखी २४ तास लागण्याची शक्यता आहे. सध्या एनडीआरएफ जवानांची एक तुकडी, अग्निशमन दलाच्या जवान आणि मुंबई महानगरपालिकेची टीम बचाव कार्य करत आहे.

## बर्निंग कारचा थरार

गार्गी खरात (१६) व कारचालक दत्तात्रेय पवार असे पाच जण होते. खरात कुटुंबीय वाकण नाका येथे नाश्ता करण्यासाठी थांबले होते. त्यांनी आपली कार वाहतुकीसाठी बंद असलेल्या वाकण येथील जुन्या पुलाच्या रस्त्यावर उभी केली होती. मात्र, यावेळी साक्षी खरात ही कारमध्येच होती. याचवेळी कारचे इंजिन असलेल्या समोरील बाजूला आग लागल्याचे कारशेजारीच सुतारकाम करणाऱ्या महिलेच्या लक्षात येताच त्यांनी कारमधील साक्षीला बाहेर येण्यास सांगितले. नंतर थोड्याच वेळात संपूर्ण कारने पेट घेतला. सदर कारमधील चारजण हॉटेलमध्ये नाश्ता करीत असल्याने व साक्षी कारमधून तात्काळ बाहेर पडल्याने पुढील अनर्थ टळला. सदर आग विझविण्यासाठी नागोठणे पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या वाकण पोलीस मदत केंद्रातील सहाय्यक पोलीस निरीक्षक एस.एस. खेडेकर व हे.कॉ. अमोल नलावडे यांनी तात्काळ आमडोशी येथील सुप्रीम पेट्रोकेम कंपनीच्या अग्निशामक दलाला बोलविले. त्यानंतर थोड्याच वेळात कारला लागलेली आग विझविण्यात आली. मात्र, जर का कारमधील सीएनजी टँकचा स्फोट झाला असता, तर वाकण नाक्यावर मोठे नुकसान झाले असते. वाकण मदत केंद्राचे एस.एस. खेडेकर व अमोल नलावडे यांनी यावेळी वाहतुकीत कोणताही अडथळा येऊ दिला नाही. या अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अपघाताचा पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे सपोनि हरेश काळसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे.कॉ. गणेश भोईर करीत आहेत.

## शेतकऱ्यांचा एमआयडीसीला विरोध

यांना देण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांचे शाब्दिकही म्हणणे भूसंपादन अधिकाऱ्यांनी ऐकून घेतले आणि त्यांनी प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना अश्वस्त केले की, आपलं वैयक्तिक आणि संयुक्तिक मी वरिष्ठांना कळवेन.

यावेळी के.जी. म्हात्रे, निलेश म्हात्रे, सुनील कोठेकर, सुशील कोठेकर, गजानन पेढवी, लक्ष्मण कोठेकर, चंद्रकांत पाटील, राजू पाटील आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी हजर होते.

## मीठ व्यवसायाला नवसंजीवनी

जणांना रोजगार मिळत होता. स्वयंपाक करण्यासाठी या मिठाला प्रचंड मागणी असताना, आंबा कलमांसाठीदेखील मिठाला पसंती दिली जात होती. परंतु, जिल्ह्यात, विशेष करून पेण तालुक्यात ठिकठिकाणी वेगवेगळे प्रकल्प उभे राहिले. प्रकल्पासाठी ठिकठिकाणी मातीचा भराव करण्यात आला. कंपनीतील सांडपाणी समुद्रात सोडले जाऊ लागले. त्याचा परिणाम मीठ व्यवसायावर मोठ्या प्रमाणात झाला. समुद्राच्या खाऱ्या पाण्यातील मीठ तयार होण्याच्या क्षमतेवर परिणाम झाला. त्याच दरम्यान बाजारात पॅकिंग मीठ दाखल झाले. त्यामुळे हा व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर होता. मिठागरे कालबाह्य होण्याच्या परिस्थितीत होती. मात्र, पेण तालुक्यातील कल्पेश पाटील, धनेश पाटील, रमेश पाटील, अभिमन्यू पाटील आदी काही तरुण शेतकऱ्यांनी पुढाकार घेत मिठागरांची निर्मिती करुन पुन्हा एकदा मीठ तयार करण्याचा व्यवसायाला नवसंजीवनी मिळवून दिली आहे.

## कंत्राटी कामगारांची उपासमार

किल्ला साफसफाईकरिता पुरातत्व विभागाकडे अपुरे मनुष्यबळ असल्याने कंत्राटी पद्धतीने कामगार घेतले जातात. हे काम चलप इंजिनियरिंग सोल्युशन्स औरंगाबाद या कंपनीला दिले असून, त्या ठेकेदाराकडून मनुष्यबळ पुरविले जाते. कामगारांना शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणात ठेकेदारांकडून वेतन देणे आवश्यक असते. परंतु, हाताच्या पोटावर जगणाऱ्या कर्मचाऱ्यांना फेब्रुवारी, मार्च, एप्रिल व मे या चार महिन्यांपासून ठेकेदारांकडून वेतन दिले गेले नाही. त्यामुळे जगावे कसे, असा प्रश्न कामगारांना पडला आहे. संबंधित चलप इंजिनियरिंग सोल्युशन्स-हर्सूल औरंगाबाद या ठेकेदाराकडे वारंवार पगार मागूनदेखील अद्याप पगार जमा करत नाही. त्यामुळे कामगारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

चलप इंजिनिअरिंग सोल्युशन्स औरंगाबाद या कंपनीच्या ठेकेदार सय्यद मोबीन यांच्याशी विचारणा केली असता ते म्हणाले की, जंजिरा किल्ल्यात व खोकरीत काम करणाऱ्या कामगारांचे बिल सहाय्यक संवर्धन अधिकारी पुरातत्व विभाग, मुरुड अलिबाग यांच्याकडे पाठविले आहेत. तिथून मला बिल न मिळाल्याने मला माझ्या कंत्राटी कामगारांना वेतन देता येत नाही. आचारसंहितेमुळे फंड जमा होत नसल्याने बिले थकली असावीत, अशी शक्यता वर्तवण्यात आली. बिल पास झाल्या-झाल्या कंत्राटी कामगारांची बिले काढण्यात येतील.

सहाय्यक संवर्धन अधिकारी पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांना विचारणा केली असता ठेकेदार सय्यद मोबीन यांनी माझ्याकडे बिले पाठवली आहेत. तीच बिले ताबडतोब मुंबई पुरातत्व कार्यालयाकडे पाठवली आहेत. तिथून बिले पास होणे जरुरीचे आहे. शासन दरबारी बिले ताबडतोब होत असतात, तर कधी उशीर होत असतो. त्या बिलावर ठेकेदारांनी अवलंबून राहणे चुकीचे आहे.

## होर्डिंग्जची प्रशासनाला धास्ती

अखत्यारित आठ एसटी बस आगार आहेत. या आगारांमध्ये सुमारे २० हून अधिक होर्डिंग्ज असून, नगरपालिका, ग्रामपंचायत व महानगर पालिका क्षेत्रामध्ये सुमारे ३० हून अधिक होर्डिंग्ज असल्याची माहिती समोर येत आहे.

जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये महामार्गासह वेगवेगळ्या ठिकाणी शहरी भागात, एसटी बसस्थानकाच्या आवारात मोठ मोठे होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत. अलिबाग-रोहा, अलिबाग-पनवेल, अलिबाग-मुरूड, अलिबाग-रेवस, मांडवा मार्गावर ठिकठिकाणी असलेल्या होर्डिंग्जची पाहणी करण्याचे काम वेगवेगळ्या यंत्रणेमार्फत सुरु करण्यात आले आहे. त्याची पडताळणी सुरु केली आहे. गंज लागलेले, जीर्ण झालेले होर्डिंग्ज काढण्याच्या सूचनादेखील करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**कारवाई होणार**

जिल्ह्यातील स्थानकांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे अंदाजे वीस होर्डिंग्ज आहेत. होर्डिंग्ज बसविण्यापासून त्याला परवानगी देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा आहे. एजन्सी नेमण्यात आली आहे. होर्डिंग्ज खराब असल्यास त्यावर कारवाईच्या करण्याच्या सूचना आगार व्यवस्थापकांना देण्यात आल्याची माहिती एसटी महामंडळ रायगड विभाग नियंत्रणक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# आंब्यांना मोठी मागणी

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

सध्या आंब्याचा हंगाम सुरू असून, रोहा तालुक्यात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर आंबा विक्रीस उपलब्ध आहे. अनेक जण आंब्याची चव चाखण्यासाठी गर्दी करत आहेत. कुडली, ता. रोहा येथील फार्म हाऊसवर मोठ्या प्रमाणावर आंब्याची विक्री होत आहे.

कुडली येथील फार्म हाऊसवर शिरवली, ता. अलिबाग येथील व्यापाऱ्याने अगोदर आंब्यांची झाडे खरेदी करून बुकिंग केली होती. नशिबाने यावर्षी उत्तम प्रकारे आंब्याचे पीक आल्याने येथील आंबा वाशी येथे मोठ्या प्रमाणावर विक्रीस जात आहे. एवढेच नाही तर विविध परिसरातील किरकोळ ग्राहकांनीसुद्धा आंब्यांना मोठी पसंती केली असल्यामुळे तेही येथे येऊन मोठ्या प्रमाणावर आंबे खरेदी करत आहेत. आंबे पिकायला अजून थोडा कालावधी असला तरी कच्च्या आंब्याच्या पेट्या ग्राहक घेऊन जात आहेत. आंबा २००, २५०, ३००, ४००, ६०० रुपये डझनप्रमाणे विक्री केली जात आहे.



# पोलिसांतर्फे होमगार्डचा सत्कार



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

निवडणूक प्रक्रियेमध्ये उत्कृष्ट काम केल्याने होमगार्ड यांचा पनवेल शहर पोलिसांतर्फे सत्कार करण्यात आला.

मतदान प्रक्रियेकरिता पनवेल शहर पोलीस ठाणेचा बंदोबस्त नेमण्यात आला होता. परंतु, मनुष्यबळ कमी असल्याकारणाने बाहेरून नवी मुंबई पोलीस मुख्यालयातील ८७ पोलीस अंमलदार व कर्नाटक एसआरपीचे एक सेक्शन तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर येथील महिला व पुरुष असे १४० होमगार्ड बंदोबस्ताकरिता पुरविण्यात आले होते. होमगार्ड यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये अतिशय उत्कृष्ट काम केल्याने त्यांचा उचित सत्कार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी केला. यावर प्रतिक्रिया देताना होमगार्ड इन्चार्ज यांनी सांगितले की, माझ्या बत्तीस वर्षीय सेवेमध्ये असा कुणीही सत्कार केला नव्हता. त्यामुळे मी खूप भारावून गेलो आहे. वपोनि नितीन ठाकरे यांचे आभार मानायला माझ्याकडे शब्द नाहीत.

# रोह्यात सारस्वतांचे स्नेहसंमेलन उत्साहात

**। खांब । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यातील सारस्वत समाज बांधवांचे स्नेहसंमेलन रविवारी (दि.१२) रोह्यातील मातोश्री मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडले.

सारस्वत हितवर्धक मंडळ, मुंबई आयोजित असलेले हे स्नेहसंमेलन, रायगड जिल्हा सारस्वत ब्राह्मण मंडळ, अलिबाग व रोहा सारस्वत परिवार यांच्या सहकार्याने घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सारस्वत हितवर्धक मंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ सिनकर तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी, निवेदक प्रसाद कुलकर्णी उपस्थित होते. सर्वप्रथम आलेल्या समाजबांधवांचे स्वागत नयन बागाव व ईशा तेंडुलकर यांनी त्यांच्या गीत गायनाने केले. त्यानंतर दीपक मुळ्ये यांनी स्नेहसंमेलनाचा हेतू विशद केला. नंतर मंडळाची आजवरची



वाटचाल विनायक किनरे यांनी अत्यंत थोडक्यात सोप्या पद्धतीने मांडली. संपूर्ण राज्यात व काही प्रमाणात राज्या बाहेरही विविध सारस्वत संस्था कशाप्रकारे कार्य करत आहेत याबाबीचा थोडक्यात परिचय प्रमोद तेंडुलकर यांनी उपस्थितांना करुन दिला. नंतर सारस्वत समाजातील स्थानिक कलाकार श्री. व सौ. कावतकर, सौ. बागाव, ईशा तेंडुलकर, स्वप्नेश किनरे, महेश कुवळेकर यांनी आपली गायन कला सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कावतकर व विनायक किनरे यांनी केले. मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल रोहा सारस्वत परिवाराचे अध्यक्ष योगेश तेंडुलकर यांनी सर्वांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## फळझाडे, कापडी पिशव्यांचे वाटप

**। रसायनी । वार्ताहर ।**

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची ३६७ वी जयंती रसायनी पाताळगंगा वाशिवली येथे मोठ्या उत्साहात पार पाडली. गेल्या पाच वर्षांपासून वाशिवली येथील रुपेश पाटील आणि त्यांचे सहकारी, किशोर पाटील, विजय शिंदे, रोहिदास शिवलेतर्फे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे पर्यावरण संवर्धनसाठी फळझाडे वाटप व प्लास्टिक बंदी जनजागृती म्हणून कापडी पिशवी वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अरुण जाधव, अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे बंधू बेडेकर, किशोर देवघरे, डॉ. संजय त्रिंबेके, मंदार पाटील हे उपस्थित होते.

# गतिरोधकांमुळे अपघाताचा धोका

**। कोर्लई । वार्ताहर ।**

अलिबाग-साळाव-मुरुड-आगरदांडा रस्त्याच्या डांबरीकरण कामात रस्त्यावर गतिरोधकांची संख्या शंभरपर्यंत वाढली आहे. या गतिरोधकांची काही ठिकाणी उंची वाढली असून, त्यांना चढ-उतार (स्लोप) नाही, ना काही ठिकाणी दर्शक फलक अथवा झेब्रा पट्टे नसल्याने वाहनचालकांची डोकेदुखी ठरत आहेत. आवश्यक असेल अशा ठिकाणी रस्त्यावर गतिरोधकांची संख्या कमी करत रंम्लिग स्ट्रिप बसवावेत, अशी मागणी नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते मुअज्जम हसवारे यांनी केली आहे.



राष्ट्रीय महामार्गावरील गतिरोधक हटवून अंतर्गतरस्त्यावरबसविण्याबाबत दि.२२ सप्टेंबर २०२३ रोजी केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना एक निवेदन देण्यात आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून राज्य, राष्ट्रीय, जिल्ह्यातील व तालुक्यातील महामार्गावर बऱ्याच ठिकाणी रस्त्यावर चढ-उतारावर असलेल्या गतिरोधमुळे वारंवार वेगमर्यादा कमी होऊन वाहन चालकांना व प्रवाशांना होणारा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

साळाव-मुरुड-आगरदांडा रस्त्याच्या डांबरीकरणानंतर रस्त्यावर गतिरोधकांची संख्या वाढली असून, गतिरोधकांसाठी दर्शक फलक, झेब्रा पट्टे नसल्याने तसेच त्यांना चढ-उतार (स्लोप) नसल्याने अक्षरशः वाहने आपटतात, त्यामुळे विशेष करून दुचाकी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने योग्य ती उपाययोजना करण्याची व काही ठिकाणी साईडपट्ट्या भरण्यात याव्यात, अशी मागणी मुअज्जम हसवारे यांनी केली आहे.

निवडक

## बॅनर हटविण्याची मागणी

**पनवेल :** मुंबईमध्ये लोखंडी बॅनरच्या घडलेल्या दूर्घटनेमुळे अनेकांचा जीव गेला व कित्येक जखमी झाले आहेत. तरी पनवेल महानगरपालिकेने तातडीने पनवेल मंब्रा महामार्गावरील भलेमोठे टोलेजंग लोखंडी बॅनर हटवावे अशी मागणी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे. पनवेल मुंब्रा महामार्गावरील लोखंडी बॅनर लावले आहेत. सध्या वादळी वाऱ्यासह पाऊस पडत असल्याने हे बॅनर कोसळून अपघाताची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## पनवेल येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** कामाला जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहिता अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शिल्पा राजू कनानी असे या महिलेचे नाव असून उंची पाच फूट दोन इंच, डोक्याचे केस काळे व लांब, नाक सरळ, डोळे काळे, डाव्या हातावर गोदलेले असून अंगावर चॉकलेटी रंगाचा पंजाबी ड्रेस सोबत हिरव्या रंगाची लेडीज बॅग आहे. या महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास त्यानी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

**मुंबई :** मुंबई अहिर सुवर्णकार ऐक्यवर्धक मंडळाचे वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेहसंमेलनाचे आयोजन महात्मा गांधी हॉल, वांद्रे येथे करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवानंद टाकसाळे, विनायक विसपुते, डॉ. अभय विसपुते, प्रा.श्रीकांत सोनवणे,डॉ. अजय भामरे, सी.डी.सोनार, ॲड. राजन दीक्षित, सुरेखा सोनार, प्रभाकर मोरे, प्रकाश ख, अध्यक्ष संजय खरोटे, सचिव हेमकांत सोनार, चैतन्य वानखेडे, राकेश रनाळकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

## वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीच्या महिला आघाडीच्या सल्लागार सोनाली साळुंखे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी संपन्न होणार आहे. दरवर्षी त्यांच्या वाढदिवसानिमित्त गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप, वृक्षारोपण, रुग्णांना फळे वाटप व गोरगरिबांना त्या मदत करत असतात. पक्षामध्ये त्या महिला आघाडीची जबाबदारी पार पडतात. त्याचप्रमाणे त्या राजिप मराठी शाळा वडघर येथील शाळा समितीच्या उपाध्यक्ष आहेत. सामाजिक संघटनांमध्ये त्यांचा सहभाग आहे.

## वर्धापन दिन सोहळा

**पनवेल :** ओरायन मॉलच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध अभिनेत्री केतकी माटेगावकर पनवेलकरांच्या भेटीला येत आहे. वर्धापन दिनानिमित्ताने आयोजित केलेल्या शॉप अँड विन या स्पर्धेतील विजेत्यांना ब्लू स्टोन तर्फे सोन्याचे दागिने तसेच लेकेॲम्पतर्फे ई बाईक बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.या लकी ड्रॉच्या भाग्यवान विजेत्यांना सुप्रसिद्ध अभिनेत्री केतकी माटेगावकर हिच्या हस्ते बक्षिसे दिली जाणार आहेत.

# माणगावकरांवर अवकाळीचे संकट !

## आंबा, काजू बागायतदार अडचणीत तर १२० हेक्टर भातपिकावरही संक्रांत



**। माणगाव । वार्ताहर ।**
**गेली चार पाच दिवसापासून रायगड जिल्ह्यात अवकाळी पावसाने उग्ररूप धारण केले असून अवकाळी पावसाचा मारा कांही पाठ सोडता सोडेना यामुळे माणगाव-तळा तालुक्यासह जिल्ह्यातील अंबा, काजू, बागातदारां बरोबरच माणगाव तालुक्यातील १२० हेक्टर क्षेत्रावरील तयार झालेल्या भातपिकावर संक्रांत कोसळली आहे. त्यामुळे रायगडावर अवकाळी पावसामुळे मोठे संकट उभारले आहे. रब्बी हंगामातील हातातोंडाला आलेले भातपीक शेतकऱ्यांच्या शेतात उभे आहे. तर कांही ठिकाणी या भातपिकाची कापणी सुरु केली आहे. त्यांमुळे शेतकरी मोठया समस्येला तोंड देत असून त्याला अवकाळी पावसाच्या कळा निमुटपणे सहन कराव्या लागत आहेत.**

सकाळी कडक उन, घामाच्या धारा, दुपारनंतर अचानक सुरु होणाऱ्या पावसाच्या सरी यामुळे एक वेगळे विचित्र वातावरण तयार झाले असून माणगाव-तळा तालुक्यात सह अनेक ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या शेतात, अंगणात भात कापून ठेवला आहे. त्याच्या मळण्या काढण्याचे काम जोरात सुरु आहे. माणगाव तालुक्यात रब्बी हंगामात यंदा १२० हेक्टर जमिनीवर भाताचे पिक शेतकऱ्यांनी घेतले आहे. ते कापण्याचे काम सुरु आहे. अवकाळी पाऊस पडत असल्याने शेतकरी पुरता संकटात सापडला आहे. सतत होणाऱ्या ह्वामानातील बदलाकडे लक्ष ठेवून उशिरा कापणी सुरु केली आहे. त्यातच अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणले आहेत. कापलेल्या भात पिकाची मळणी शेतकऱ्यांनी थांबवली आहे. अवकाळी पावसाने जिल्ह्यात थैमान घातल्याने शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. तर कांही शेतकऱ्यांकडे निवारा नसल्याने त्यांच्या भाताचे नुकसान होत आहे.

दिवसभर आकाश निरभ्र राहून दुपारनंतर मात्र अचानक हलक्याशा पावसाच्या अचानक सरी पडतात त्यामुळे मळणी करणाऱ्या शेतकऱ्यांची तारांबळ उडाली आहे. तर कोकण रब्बी हंगामातील कोरडवाहू शेतकरी कालव्याच्या पाण्यावर भातपिक घेतो. रायगड जिल्ह्यातही मोठया प्रमाणात काजू, अंबा बागायतदार मोठ्या प्रमाणात आहेत. आंबा फळ हे पूर्ण झाले असून यामुळे हा धोका अंबा, काजू उत्पादकांसमोर उभा आहे. या पिकावर अनेक फळ उत्पादक शेतकरी अवलंबून आहे. ते ही पिक निसर्गाने काढून घेल्यास करायचे काय ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. माणगाव तालुक्यात भात पिकाची कापणी मोठ्या प्रमाणात सुरु असून अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

# रायगड लोकसभेच्या मतपेट्या अभेद्य सुरक्षेत

**। रायगड । प्रतिनिधी ।**

३२ रायगड लोकसभा मतदार संघाच्या अंतर्गत येणाऱ्या पेण, अलिबाग, श्रीवर्धन, महाड, गुहागर व दापोली या विधानसभा मतदार संघामध्ये मतदानाची प्रक्रिया पार पडल्यानंतर सर्व मतदान केंद्रावरील मतपेट्या जिल्हा क्रीडा संकुल नेहुली, अलिबाग या ठिकाणी तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रुममध्ये सुरक्षितपणे ठेवण्यात आल्या आहेत.

स्ट्राँग रुमच्या सुरक्षेकरिता निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे सुरक्षा बंदोबस्त व्यवस्था करण्यात आली आहे. त्या ठिकाणी त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. संपूर्ण बंदोबस्त व्यवस्थेचे प्रभारी अधिकारी म्हणून अलिबागचे उप-विभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी यांना नियुक्त करण्यात आले आहे.

पहिल्या स्तरामध्ये केंद्रिय सशस्त्र दल ११३ बटालीयन कंपनी चे एक प्लाटून नेमण्यात आले आहे. या प्लाटूनमधील सशस्त्र जवान हे स्ट्राँग रुमच्या जवळच्या सर्वात आतील कॉर्डन १ मध्ये असतील व त्यांची स्ट्राँग रुम वर २४ तास नजर असेल. तसेच स्ट्राँग रुममध्ये लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही.चे कंट्रोल रुम यांच्या ताब्यात असेल.

दुसऱ्या स्तरामध्ये राज्य सशस्त्र दल ग्रुप ८, मुंबई येथील एक प्लाटून नेमण्यात आले आहे. या प्लाटूनमधील सशस्त्र जवान हे स्ट्राँग रुमच्या जवळच्या कॉर्डन २ मध्ये असतील व त्यांची कॉर्डन - १ च्या बाहेरील परिसरामध्ये २४ तास पेट्रोलिंग असेल तसेच यातील वॉच टॉवरवर तैनात जवान आजुबाजूच्या परिसरावर नजर ठेवून असतील.

तिसऱ्या स्तरामध्ये रायगड पोलीस दलातील ६ अधिकारी व ४० पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामध्ये सशत्र अंमलदारांचाही समावेश असेल. हे अंमलदार स्ट्राँग रुमच्या जवळच्या कॉर्डन-३ मध्ये असतील व त्यांची कॉर्डन २ च्या बाहेरील परिसरात तसेच जिल्हा क्रीडासंकुलाच्या आजुबाजूच्या संपूर्ण परिसरामध्ये २४ तास गस्त असेल. जिल्हा क्रीडा संकुलामध्ये प्रवेश करण्याऱ्या प्रत्येक वाहनाची तसेच प्रत्येक व्यक्तीची मुख्य प्रवेशद्वाराजवळ तपासणी केली जाईल व केवळ अधिकृत व्यक्ती व वाहनांनाच प्रवेश दिला जाणार आहे. जिल्हा क्रीडा संकुलाच्या परिसरामध्ये सीसीटीव्ही बसवण्यात आले असून त्याद्वारेही परिसरात नजर ठेवली जाणार आहे. संपूर्ण बंदोबस्तामध्ये बंदोबस्तामधील जवानांमध्ये आपसात समन्वय ठेवण्यासाठी बिनतारी संदेशवहन/दळणवळनाची सुविधा असून त्याद्वारे रायगड पोलीस दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाचे अधिकारी संपूर्ण बंदोबस्तावर लक्ष ठेवून असणार आहेत.

# चिरनेरमध्ये शंभूराजांना अभिवादन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेरच्या ऐतिहासिक शौर्यभूमीत कातळपाडा येथील दत्त मंदिराच्या प्रांगणात छावा प्रतिष्ठानतर्फे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा जयंती उत्सव सोहळा मंगळवारी १४ मे रोजी ऐतिहासिक वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी सकाळी छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म सोहळा, पाळणा गीत तसेच छत्रपती शंभुराजांच्या प्रतिमेचे पूजन व शंभूराजांना अभिवादन करण्यात आले. ज्येष्ठ कार्यकर्ते मारुती रेवसकर यांच्या हस्ते शंभूराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रसिद्ध गायिका सुजाता गोंधळी यांच्या पाळणा गीताला सुरावटी लाभल्या.

सायंकाळी शंभू राजांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत भगवी टोपी घातलेले तरुण-तरुणी, नऊवारीतील तरुणी व महिला फुलांची उधळण करताना दिसत होत्या. टाळ मृदुंगाच्या साथीत, अवघा आसमंत दुमदुमून टाकणारा छत्रपती संभाजी महाराज की जयचा, जयघोष अशा ऐतिहासिक वातावरणात निघालेल्या मिरवणुकीत चिरनेर गावातील अनेक तरुण, तरुणी व महिला विविध वेशभूषेत सहभागी झाल्या होत्या.

छत्रपती शिवाजी महाराज की जय, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय, आणि जय भवानीच्या जय घोषामुळे चिरनेर गावातील वातावरण प्रसन्न होऊन, शिवमय झाले होते. गावातील लेझीम पथकातील मुलींनी नऊवारीची वेशभूषा परिधान करून मिरवणुकीत सामील होऊन, लेझीमची सुंदर अशी अदाकारी सादर केली.

# मलनि:सारण प्रकल्पाचे निकृष्ट दर्जाचे काम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने अधिकारी निवडणुकीचे कामात गुंतले आहेत.त्याचा फायदा अनधिकृत आणि बेकायदेशीर कामे करण्यासाठी घेतला गेला आहे.तसाच फायदा माथेरानमध्ये ५० कोटी खर्चाच्या मलनि:सारण प्रकल्पाचे काम करण्यासाठीदेखील संबंधित ठेकेदाराने केला आहे.



माथेरानमध्ये सांडपाणी दरीमधून पायथ्याशी असलेल्या मोरबे धरणात जावून धरणाचे पाणी दूषित होण्याची शक्यता होती. त्यामुळे राज्य मानवी हक्क आयोगाने आदेश दिल्यानंतर मलनि:सारण प्रकल्प मंजूर झाला. ४७ कोटींच्या मलनि:सारण प्रकल्पाचे ठेकेदार असलेल्या कंपनीला या कामाचा ठेका तब्बल पाच टक्के अधिक या दराने देण्यात आला आहे. या प्रकल्पात माथेरानमध्ये सहा वेगवेगळ्या ठिकाणी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. मात्र या प्रकल्पाचे काम सुरू झाल्यापासून संबंधित कामाची सल्लागार कंपनी, ठेकेदार यांनी संगनमत करून कामाचा दर्जा नित्कृष ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर संबंधित कामाबद्दल सर्वत्र नाराजी असल्याने माथेरान पालिकेने कामाची चौकशी करण्यासाठी ते काम साधारण महिनाभर बंद ठेवले. नंतर अर्धवट कामांची पाहणी पूर्ण झाल्यावर पुन्हा कामे सुरू झाली. त्यावेळी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली. या काळात अधिकारी वर्ग हे निवडणुकीच्या कामात व्यस्त असतात आणि ते लक्षात घेवून माथेरानमधील सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प यांचे ठेकेदाराने फायदा उचलण्याचा प्रयत्न केला.

सध्या अतिशय वेगाने सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे काम सुरू असून त्यावेळी तुटलेले चेंबर पुन्हा लावले जात आहेत. सिमेंट चेंबर बांधकाम करताना पाण्याचा वापर केला जात नाही तसेच वाळू ऐवजी ग्रीड वापरून चेंबर बांधले जात आहेत. माथेरान शहरात आड बाजूला सुरू असलेली कामे ठेकेदाराकडून अतिशय नित्कृष्ट दर्जाची केली गेली आहेत. त्यात पाईप लाईन टाकताना तेथे सिमेंट पिचींग केली जात नाही असे दिसून आले आहे.त्याबाबत माथेरान मधील जागरूक नागरिक विचारणा करायला पालिकेत जात आहेत.परंतु अधिकारी निवडणुकीचे कामावर आहेत अशी उत्तरे दिली जात आहेत. ठाकरे गटाने या निकृष्ट कामाबद्दल उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

## नितीन बामगुडे यांचा सन्मान

**माणगाव :** माणगावचे माजी नगरसेवक, यशस्वी तरुण उद्योजक नितीन विष्णू बामगुडे यांना आविष्कार फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेतर्फे राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावर्षी फाऊंडेशनतर्फे पन्हाळगड याठिकाणी भव्य दिव्य अशा कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला. या सोहळ्यात माणगावचे नितीन बामगुडे यांचा संस्थेतर्फे सन्मान करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्याला फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार संजय पवार, राज्य पुरस्कार निवड समिती सदस्य माधुरी सावंत, फाउंडेशनचे रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष किशोर मोहिते आदी मान्यवरांसह राज्यभरातून पुरस्कारती व नागरिक बंधू - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होती.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. १. वेटर २. रिसेप्शन ३. हॉटेल मॅनेजर २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसअॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३.
- वायशेत येथे मुख्य हमरस्त्यानजीक २ गुंठे प्लॉट वीज, पाणी, वॉलकंपाऊंड, गेट, भराव, शेड व असेसमेंटमधील भाड्याने देणे आहे/विकणे आहे. संपर्क : ७०४५३६६६५२
- सुरभी स्वयंसेवी संस्था अलिबाग ऑफिस कामासाठी मुले/मुली/महिला पाहिजेत. शिक्षण BA, B.Com, Bsc, msw MBA सिविल हॉस्पिटल अलिबागमध्ये स्वच्छता दूत कामासाठी महिला/पुरूष पाहिजेत. संपर्क : ९४२०६४५५७९/९५२७०४०७५० पत्ता : सुरभी स्वयंसेवी संस्था, कलेक्टर ऑफिस समोर अलिबाग
- रायवाडी कॉम्प्लेक्स अलिबाग शहरामध्ये असलेल्या स्टार हेल्थ इन्शुरन्स ऑफिसमध्ये स्टाफ आवश्यक आहे. कम्प्युटरचे ज्ञान अत्यावश्यक, शक्यतो पदवीधर असावा. दोन उमेदवार आवश्यक आहेत. स्त्री-पुरूष कोणीही चालतील, अनुभव असेल तर उत्तम. ९८२२९३८४४४ या नंबरवर रिझ्युम सेंड करावा. त्याप्रमाणे आपल्याला संपर्क करण्यात येईल.
- पिंपळभाट, अलिबाग येथे मेडिकल एजन्सीजमध्ये कामासाठी मुले पाहिजेत. शिक्षण- १० ते १२ किमान व अलिबागच्या आजूबाजू परिसरातील हव्यात. ९६२३३६६७७८
- पिंपळभाट अलिबाग येथे मेडिकल एजन्सीजमध्ये सेल्समन म्हणून मुले पाहिजेत. (शिक्षण १० ते १२ किमान) (वय २०-३० पर्यंत) ९६२३३६६७७८
- Shop near Alibag ST Stand is for sale 9764548679

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




# महाडमध्ये फलकांचा धोका

**। महाड । वार्ताहर ।**

महाड नगर पालिकेने जाहिरातीसाठी दिलेल्या ठेकेदाराकडून शहरात बसवलेले होर्डिंग नागरिकांसाठी धोकादायक बनले आहेत. भर गर्दीच्या ठिकाणी बसवलेल्या भल्या मोठ्या होर्डिंगकडे पालिका प्रशासनाने मात्र दुर्लक्ष केले आहे. गर्दीच्या ठिकाणी आणि शाळांच्या परिसरात होर्डिंग लावण्यात परवानगी कोणी दिली याची चौकशी होणे गरजेचे आहे.

महाड शहरात होर्डिंग नियमावलीची पायमल्ली करत एकाच ठेकेदाराला पुन्हा पुन्हा संधी दिली जात आहे. मात्र या ठेकेदार कंपनीकडून शहरातील गजबजलेल्या ठिकाणी आणि शालेय परिसरात होर्डिंग लावण्यात आले आहेत. यापूर्वी देण्यात आलेल्या महाड नगर पालिकेने शहरामध्ये सूचित केलेल्या जागेत होर्डिंग बसवण्याकरता प्रसिद्ध केलेल्या निविदेतून महाड नगर पालिका वर्षाला दहा लाख रुपये मिळत आहेत. संबंधित ठेकेदाराकडून घेतले आहेत. मात्र महाड शहरात अनधिकृत बांधकामे आणि वाहतूक व्यवस्था सुधारण्यात पालिकेला अद्याप यश आलेले नाही. शहरात विविध ठिकाणी उभे केलेले होर्डिंग धोकादायक असून देखील पालिकेचे दुर्लक्ष आहे. याठिकाणी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून काम केले असून प्रशासनाच्या हि बाब निदर्शनास येवू नये हि आश्चर्याची बाब आहे.

# नेरळ परिसरात अवकाळी पावसाचा कहर

- **अनेक ठिकाणी झाडे कोसळली, घराचे पत्रे उडाले,**
- **विजेचे पोलदेखील कोसळले, नेरळ परिसर अंधारात**

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ परिसरात अवकाळी पावसाने अनेक ठिकाणी नुकसान झाले नेरळ शहरातील नेरळ शिवसेना शाखा कार्यालय येथे झाडाची फांदी कोसळून शाखेचे व घराचे पत्रे फुटल्याने मोठे नुकसान झाले. नेरळ कोल्हारे येथे एका शेडचे पत्रे उडून थेट रस्त्यावर पडले आहेत तर विद्युत वाहक तारा देखील तुटून विद्युत प्रवाह खंडित झाला,तळवडे येथे एका शेतकऱ्याच्या अब्यांच्या बागेत अब्यांची झाडे उन्मळून आंबा पिकाचे नुकसान झालं.

कर्जत तालुक्याला मागील तीन दिवस अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे.त्यातच १३ मे रोजी मावळ लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी देखील मतदारांना पावसाने बाहेर पडून दिले नव्हते. दरम्यान आज १४ मे रोजी नेहमी प्रमाणे पावसाने दुपारी चार वाजण्याच्या सुमारास सुरुवात झाली.

एक तास पडलेल्या मुसळधार पावसाने पहिल्या सरीतच नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील परिसर पाण्याने तुंबला होता तर नेरळ बाजारपेठ येथील ठाकरे शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथील बदामाच्या झाडाची भली मोठी फांदी कोसळली तर येथील घरावर देखील झाडाची फांदी पडल्याने शाखेचे व घराचे सिमेंट पत्रे फुटून नुकसान झाले आहे.

कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत देखील इमारतीच्या वरती बसवण्यात आलेल्या पत्र्याचे शेडचे पत्रे वाऱ्यात उडून पत्रे







रस्त्यावर पडले आहेत, सुदैवाने हे पत्रे पादचारी व्यक्तीच्या बाजूस पडल्याने व्यक्ती थोडक्यात बचावला.

यावेळी येथील विद्युत वाहक पोल वरील वाहक तारा देखील तुटल्याने नेरळ परिसर व कोल्हारे गाव अंधारात आहे. कोल्हारे गावात जाणाऱ्या रस्त्यावर झाडे आडवी झाल्याने रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला. तळवडे गावात देखील दिलीप शेळके या शेतकऱ्याचे अंबा बागेतील अब्यांची झाडे उन्मळून पडून अंबा पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.

# पशुवैद्यकीय दवाखाना रिक्त पदांचा ‘वाडा’

## चार कर्मचारी सांभाळत आहेत श्रीवर्धन तालुका

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

३७ लाखाच्या मान्यतेनुसार श्रीवर्धन तालुक्यातील रानवली येथे पशु वैद्यकीय दवाखान्याचे उद्घाटन झाले होते. श्रीवर्धन तालुक्यातील बहुतांश नागरिक पशुपालन करणारे असून चांगल्या सुविधा त्यांच्या गुरांसाठी हा पशु वैद्यकीय दवाखाना उपलब्ध झाल्याने पशुपालक आनंदित होते.

आजच्या स्थितीत रानवली येथील रायगड जिल्हा परिषदेच्या पशु वैद्यकीय दवाखाना श्रेणी १ येथे सोळा पैकी फक्त चार पदे भरली गेली आहेत व बारा पदे रिक्त आहेत.यामुळे रानवली पशुवैद्यकीय दवाखाना रिक्त पदांचा वाडा बनला आहे.

रानवली येथील दवाखान्यासह



श्रीवर्धन तालुक्यातील हरेश्वर, सायगाव, दिघी, बोर्लीपंचतन व दांडगुरी येथील पशु वैद्यकीय उपकेंद्र ही पशु वैद्यकीय दवाखान्यातील फक्त चार कर्मचारी सांभाळत आहेत.

श्रीवर्धन तालुक्याची ओळख ही बागायती व शेती पुरक व्यवसायाने नटलेला प्रदेश अशी आहे.आज प्रत्येक बागायतदारानी आपल्या व्यवसायाला उपयुक्त अशी गुरे सांभाळली आहेत.

बदलते हवामान, वातावरण

> सप्टेंबर महिन्यात रायगड जिल्ह्यात नऊ पशुधन विकास अधिकार्यांची नियुक्ती होत आहे तसेच जिल्ह्यात तीस पशुधन पर्यवेक्षकाची रिक्त पदे जुन महिना अखेरीस पर्यंत भरली जातील.यामुळे पशुपालकांची गैरसोय लवकर दुर होईल.
> - डॉ.शाम कदम,
> पशुसंवर्धन अधिकारी.जिल्हा परिषद.अलिबाग.

ह्यामुळे पाळीव गुरढोरांना आजारपण येतेच अनेकदा वाहनाच्या धडकेत किंवा गुराढोरांच्या झोंबीत गुरे जखमी होतात.

श्रीवर्धन तालुक्यात पाळीव जनावरे आजारपणाने मृत्यूमुखी पडल्याच्या तुरळक घटना घडल्या आहेत. वाहनाच्या धडकेत गुरे जखमी होतात. अनेकदा वेळेत उपचार न मिळाल्यामुळे गुरे मृत्यूमुखी पडणे किंवा गुरांना कायमचे अपंगत्व ही येण्याच्या घटना तालुक्यात घडल्या आहेत. श्रीवर्धन तालुक्यातील अनेक शेतकरी रानवली येथे पशुवैद्यकीय दवाखाना सुरू झाल्यावर समाधानी झाले होते परंतु रिक्तपदांची संख्या बघून निराश झाले आहेत.

### पशुसंवर्धन विभागाचा रिक्त पदांचा अहवाल

| संवर्ग | पदनाम | मंजुर पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| १ | पशुधन विकास अधिकारी | ०३ | ०३ |
| २ | पशुधन विकास अधिकारी | ०१ | ०१ |
| ३ | सहाय्यक पशुधन विस्तार अधिकारी | ०१ | ०१ |
| ४ | पशु पर्यवेक्षक | ०३ | ०३ |
| ५ | व्रणोपचारक | ०२ | ०० |
| ६ | शिपाई | ०६ | ०४ |
| | एकुण | १६ | १२ |

# सेंद्रीय खत प्रकल्प एक स्तुत्य उपक्रम

**। पेण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण म्हणजे पेण शहर. पेण शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन तत्कालीन राज्यकर्त्यांनी २०१०-११ च्या सुमारास पेण शहरापासून चार किलोमीटर अंतरावर आंबेघर ग्रामपंचायतीच्या हद्दीत घनकचरा व्यवस्थान प्रकल्प नियोजित केला. या खताला शासनाने 'ग्रीन ब्रॅन्ड' पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत असा हरित ब्रॅन्ड दिला असल्याने राजाश्रय मिळालेला आहे. रायगड जिल्ह्यात नव्हे तर, कोकणातील घनकचरा व्यवस्थापनातून सेंद्रीय खत निर्माण करणारा हा अग्रगण्य प्रकल्प आहे.

पेण शहर हे आधुनिक नसून, ऐतिहासिक शहर आहे. झपाट्याने होत असणाऱ्या शहरीकरणामुळे पेण शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. भविष्यात एमएमआरडीईचा विचार करता पेण शहर हे तिसऱ्या मुंबईचे केंद्रस्थान होऊ पाहत आहे. पेण शहर हे ऐतिहासिक असल्याने सांडपाणी, घनकचरा विल्हेवाट लावणे हे तसं पाहता आव्हानात्मकच. परंतु, पेण शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन तत्कालीन राज्यकर्त्यांनी २०१०-११ च्या सुमारास पेण शहरापासून चार किलोमीटर अंतरावर आंबेघर ग्रामपंचायतीच्या हद्दीत घनकचरा व्यवस्थान प्रकल्प नियोजित केला. २०१४ ला या प्रकल्पाचा शुभारंभदेखील झाला. परंतु, ठेकेदार आणि नगरपालिका प्रशासन यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार ठेकेदाराने अटी व शर्तींचे पालन न ठेवल्याने हा प्रकल्प डबघाईस आला. परंतु, २०१८ नंतर आलेल्या आरोग्य खात्यातील कर्मचाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या सल्ल्याने पुढाकार घेऊन हा प्रकल्प नव्याने सुरू करण्याचा विचार केला. साधारणतः हा पूर्ण प्रकल्प तीन एकर जागेमध्ये वसलेला आहे. पेण शहराच्या लोकसंख्येचा विचार करता शहरातून दररोज १५ मेट्रिक टन घनकचरा निर्माण होत आहे. यामध्ये ९ मेट्रिक टन ओला कचरा, ६ मेट्रिक टन सुक्या कचऱ्याचा समावेश आहे. हा संपूर्ण कचरा १० घंटागाडीच्या सहायाने उचलला जाऊन तो हायटेक ट्रान्सफर सेंटर येथे नेण्यात येतो. नंतर त्या ठिकाणी कॉम्पॅक्टर कॅपसूल तंत्रज्ञानाद्वारे ओला व सुका कचरा वेगवेगळा करून आंबेगाव येथे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे नेण्यात येतो. आंबेगाव येथे ओल्या कचऱ्यावर विंड्रो कंपोस्टींगद्वारे सेंद्रीय खत निर्मिती करण्यात येते. सिंपल प्रोसेसिंग मशीनद्वारे २४ तास प्रक्रिया करून सदर कचरा बारीक केला जातो. प्रक्रियेअंती या ओल्या कचऱ्याचे सेंद्रीय खत निर्माण होते. काही प्रमाणात दमट असल्याने त्याला स्क्रिनिंग मशीनमध्ये ते सेंद्रीय खत सुकवून चाळणीद्वारे गाळले जाते आणि नंतर त्या खताची पॅकिंग केली जाते आणि विक्रीसाठी ठेवले जाते. साधारणतः महिन्याला १० ते १५ टन एवढी खतनिर्मिती केली जाते. या खताचा वापर पेण नगरपालिकेच्या गार्डनसाठी तसेच शेतकऱ्यांसाठीदेखील उपलब्ध करून दिला जातो. या प्रकल्पाला भेट देण्याचे आवाहन आरोग्य अभियंता अंकिता इसाल आणि आणि आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण यांनी कृषीवलशी बोलताना केले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर मालक/ कब्जेदार आमचे अशिलांकडून ठरलेली किंमत स्वीकारून रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करून देणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालकाचे नाव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र - हे. आर. पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| श्री.प्रफुल मनजीभाई कपुपरा | ४०/३ | ०-३१-७० पो.ख.०-०२-८० एकुण ०-३४-५० | ३.६२ |
| | ३९/१ | ०-०३-५० पो.ख. ०-०१-४० एकुण ०-०४-९० | ०.७८ |
| | १/५ | ०-०९-१० पो.ख.०-०१-५० एकुण ०-१०-६० | ०.२२ |

वर नमूद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक/ कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-
**श्री. पराग प्रफुल्ल म्हात्रे**
ॲडव्होकेट हाय कोर्ट व नोटरी भारत सरकार ११,
केशव वसंत, जुने तहसील कार्यालयासमोर,
पनवेल, ता. पनवेल जि. रायगड. ९८३३७३८७११

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे इंद, ता.अलिबाग येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम.सीमा ललित कनकाटे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| इंद | ५ | ०-१९-३० पो. ख. ०-०२-७० ०-२२-०० | ४.०२ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १६/०५/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल सौ. कल्पना घनश्याम गायकवाड यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री. राजाराम मल्हारी भगत यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. उकूळ, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ८७ | ३ /अ | ०-७२-९० पो.ख.०-०१-५० | १२-८१ |

यापैकी ०-१६-०० हे. आर. क्षेत्राची मिळकत विकत देणचे ठरले आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. १६/०५/२०२४.

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राम्हणआळी, नेरळ ता. कर्जत,
जि. रायगड मो.- ९३२५०६००३७.

# वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**खरोशी :** अखिल भारतीय आगरी समाजिक संस्थेच्या सातव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून येत्या २५ मे रोजी सकाळी ठीक ११ वाजता पेण येथील आगरी समाज सभागृहात आगरी समाजातील स्त्री-पुरुषांसाठी खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेमध्ये संस्थेने खालील सामाजिकविषयठेवलेआहेत. यामध्ये आगरी समाजाच्या अधोगतीला असंघटितपणा कारणीभूत. आगरीबहुल इलाख्यातला विकास समाजाला शाप की वरदान, नोकरभरती स्थानिकांवर अन्याय : शासनकर्त्यांची उदासीनता की लोकप्रतिनिधींचा नाकर्तेपणा, आजची तरुणाई भविष्याच्या विचारांपासून भरकटतेय. आगरी लोकपरंपरा आणि लोकसंस्कृतीचा होतो आहे ऱ्हास. यापैकी कोणत्याही एका विषयावर स्पर्धकाला आपले विचार मांडता येतील. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. विषय, आशय आणि सादरीकरण या निकषांवर विजेत्याची निवड होईल. तरी स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी आपली नावे १५ मेपर्यंत आल्हाद पाटील-पनवेल ७०४५४४४१९७, नलिनी पाटील-ठाणे- ९००४३५७६५०, पी.वाय. पाटील-पेण- ९४२२४९५३६२ यांच्याकडे नोंदवावीत, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

**रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन**
**(महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन संलग्न) रजि न. एफ २४१, मुंबई १६/८१**
**विशेष सर्व साधारण सभेची नोटीस**

जावक क्र. ०९/२०२४ दि. १५/५/२०२४

प्रति,
......................................
......................................

**विषय–: सर्व साधरण सभा**

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, रायगड जिल्हा असोसिएशन ची विशेष सर्वसाधारण सभा दि. ३० मे २०२४ रोजी सकाळी ठिक ११ वाजता शिक्षक पतपेढी हॉल, अंतोरा फाटा, कोटक महेंद्रा बँकजवळ पेण, ता.पेण, जिल्हा रायगड, ४०२१०७ या ठिकाणी आयोजित केलेली आहे. तरी या सभेसाठी आपण आवर्जून उपस्थित रहावे हि नम्र विनंती.

सभेपुढील विषयसुची खालील प्रमाणे असेलः-

१) सभेच्या अध्यक्षाची निवड करणे.
२) संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम राबविणे, तसेच निवडणूक प्रक्रियेअंती नवीन कार्यकारी मंडळ जाहीर करणे.

**विशेष सुचना**

१) गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास हीच सभा अर्धातास (३० मिनिटं) वाट बघून पुन्हा ह्याच दिवशी, ह्याच ठिकाणी घेण्यात येईल व अशा सभेला गणपूर्तीचे बंधन असणार नाही. तसेच या सभेत घेण्यात आलेले सर्व निर्णय सदस्यांवर बंधनकारक असतील, सर्व सदस्यांनी याची नोंद घ्यावी ही नम्र विनंती. सदर सभा त्याच ठिकाणी घेण्यास येईल त्या करिता कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) निवडणूक नामनिर्देशन अर्ज तसेच या संदर्भात कोणताही कार्यालयीन पत्रव्यवहार करणे करिता पत्ता श्री. प्रशांत जयराम ओक सरचिटणीस, मोरेश्वर चित्रमंदिर, पेण तालुका, पेण, जि.रायगड ४०२१०७.
३) कृपया येताना आपले ओळख पत्र बरोबर घेऊन येणे.

कळावे,

आपला विश्वासू,
**श्री. प्रशांत जयराम ओक**
सरचिटणीस, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन

**मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड**
स्थापना सन १८८८
E-mail-co.murud janjira @gmail.com

म्यु.जा.क्र.२००/बांध/२०२४-२५ दिनांक :-१५/०५/२०२४

## जाहीर निवदेन

याद्वारे मुरुड शहरातील खाजगी इमारतीवर/सार्वजनिक ठिकाणी उभारलेल्या तमाम होर्डिगधारकांना तसेच रस्त्याच्या कडेला मोठया आकाराचे फ्लेक्स बोर्ड उभारणाऱ्या जाहीरात धारकांना सुचित करण्यात येते की, सद्य:स्थितीत वादळी वाऱ्यामुळे मोठ्या आकाराचे होडिंग बोर्ड तुटून रस्त्यावरील नागरीकांच्या आंगावर पडुन जिवितहानी होण्याच्या घटणा घडत आहेत. त्या अनुषगांने सुचित करण्यात येते की, मुरुड शहरातील खाजगी इमारतींवर/सार्वजनिक ठिकाणी उभारलेल्या होडिंगधारकांनी होडिंग उभारलेल्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन तसेच मिळकतधारकांशी केलेला करारनामा, मिळकतधारकाने व मुरुड नगरपरिषदेने होर्डिंग उभारण्यासाठी दिलेला ना-हरकत दाखला हे जाहीर निवेदन प्रसिध्द होताच ३ दिवसांच्या आत मुरुड जंजिरा नगरपरिषदेमध्ये सादर करण्यात यावे. अन्यथा मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर मुंबई पोलीस अधिनियम १९५१ महाराष्ट्र विद्रुपीकरण विरोधी कायदा १९९५, भारतीय दंड विधान संहिता १८६० मधील तरतुदी नुसार दखलपात्र गुन्हे दाखल केले जाईल, याची नोंद घ्यावी. अन्यथा सदरचे होडिंग जप्त करण्यात येईल.

सही/-
**(पंकज अनिल भुसे)**
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मौजे ममदापूर ता. कर्जत जि.रायगड येथील स.नं.१६०/१६ क्षेत्र १७२ चौ.मी. आकार १७.२० रु. पै. अशी बिनशेती मिळकत सुब्रा हातीमभाई कराचीवाला व १ यांचेकडून मेसर्स दरवेश कंन्स्ट्रक्शन तर्फे मोहम्मद नदीम उस्मान दरवेश यांनी दिनांक २२.१२.२०२२ रोजी विकसन करारनामा केलेला दस्त क्रंमाक ६०६८/२०२२ असा दस्त आणि सदर दस्ता बाबत केलेले कुळअखत्यारपत्र दस्त कंमाक ६०६९/२०२२ असे दोन्ही दस्त हरविलेले आहेत. त्याबाबत खार पोलीस स्टेशन येथे तक्रार दिनांक ०७.०५.२०२४ रोजी नोंदविलेली असून त्याचा तक्रारी नंबर ६०५/२०२४ असा आहे.

येणेप्रमाणे सदर दस्त हरविले बाबत मेसर्स दरवेश कंन्स्ट्रक्शन तर्फे मोहम्मद नदीम उस्मान दरवेश यांनी तक्रार नोंदविली असून याबाबत जाहीर पेपर नोटीस देणेत येत आहे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

मेसर्स दरवेश कंन्स्ट्रक्शन तर्फे
मोहम्मद नदीम उस्मान दरवेश
पत्ता : दरवेश चेंबर्स, चौथा मजला
एस.व्ही.रोड, खार पश्चिम मुंबई-५२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे थेरोंडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बागायत मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार(रु.पै.) |
|---|---|---|---|
| थेरोंडा ता.अलिबाग | २५/२ | बागायत ०-६७-३० पो.ख. क्षेत्र ०-०२-८० एकूण क्षेत्र ०-७०-१० | ३८.२५ |

वर वर्णन जमिन मिळकतीपैकी श्री नवीन देवप्पा शेट्टी यांचे नावे असलेले ०-२०-२० हे. आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक श्री. नवीन देवप्पा शेट्टी, रा. अ/१९, एकदंत अपार्टमेंन्ट मानपाडा रोड, विनया बँकेजवळ, डोंबिवली पूर्व यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पूर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिथे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, तावा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जा नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १५/०५/२०२४
मोवा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु.बुरूमखाण पो. वरसोली
ता.अलिबाग, जि. रायगड,

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की. मौजे-सापेल ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र. हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मोहनलाल केशरीमल ओसवाल | ९ | ५ | ०-१५-२० | २=०० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- १६/५/२०२४

**ॲड, दिपक प्रभाकर डवरी**
नंदी को-ऑपरेटीव हाऊसिंग
सोसायटी प्लॉट नं -१४ मु.लाडीवली,
पोस्ट तिवरे ता. कर्जत जि-रायगड
पिन - ४१०२०१

## जाहिर आवाहन!

अलिबाग नगरपरिषदेच्या वतीने अ.न.प. हद्दितील सर्व मालमत्ताधारकांस सूचित करणेत येत आहे की, अलिबाग नगरपरिषद हद्दितील मालमत्तांचे चतुर्थ पुनर्मुल्यनिर्धारणाचे काम चालू झालेले असून त्याकामी नगरपरिषदेने नियुक्त केलेल्या एजन्सीचे मार्फत नियुक्त केलेले कर्मचारी आपल्या मालमत्तेचे सर्व्हेक्षण करण्यासाठी आपल्या मालमत्तेस भेटी देणार आहेत. आपण त्यांना आपल्या मालमत्ता हक्कांबाबत सर्व पुरावे सादर करावे व आवश्यक योग्य ती माहिती देऊन त्यांस सहकार्य करुन सर्वेक्षणाचे काम योग्य तऱ्हेने पूर्ण होण्यास सहकार्य करावे, ही विनंती !

सही/-
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बेलवली, ता. अलिबाग येथील गट नं. ४५/२, एकूण क्षेत्र ०-४१ -०० हे.आर., आकार ५.५६ रू.पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२०-०० हे. आर. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. चंद्रकांत हिरू घरत रा. मु. बेलवली, पो. मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १५/०५/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो,ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

अशोका प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित श्रीबाग नं. ३, ता. अलिबाग यांज तर्फे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अशोका प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित श्रीबाग नं. ३ ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून सदर इमारतीचा पत्ता अशोका प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित श्रीबाग नं. ३, अलिबाग रेवस रोड लगत, मुख्य अलिबाग रस्त्यालालागून, पी. एन. पीच्या समोर, एस. टी. स्टॅण्डजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड असा आहे. उपरोक्त संस्थेच्या नावे व ताबेकब्जात अलिबाग नगरपालिका हद्दीतील श्रीबाग क्षेत्र डेव्हलमेंट स्किम नं. ३ बी मधील प्लॉट नं. सी ११, एकुण क्षेत्र ६०० चौ. मीटर आणि प्लॉट नं. सी १२, एकुण क्षेत्र ७५० चौ. मीटर असे एकत्रित १३५० चौ. मीटर वर्णन असलेली जमिन मिळकत आहे. सदर जमिन मिळकतीवर आज रोजी अशोका प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित श्रीबाग नं. ३, ता. अलिबाग या संस्थेची इमारत अस्तित्वात आहे. या इमारतीमध्ये एकूण ५४ दुकान गाळे व कार्यालये आहेत.

सदर इमारत ही साधारणतः ४० वर्षाची जुनी इमारत असून तिचा पुर्नविकास करण्याचा आहे. तसेच तळ मजल्यावरील दुकान गाळ्याचे जे बिल्टअप क्षेत्र आहे ते त्याप्रमाणेच देण्यात येईल. तरी उपरोक्त पुर्नविकास करणेकामी आर्थिक आणि तांत्रिक दृष्टीने सबळ असणाऱ्या अशा स्वरुपाचा बांधकामाचा पुर्वानुभव असणाऱ्या इच्छुक विकासकाकडून/बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांजकडून सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसात निविदा/टेंडर मागविण्यात येत आहे. संबंधित कागदपत्रे व इतर तपशील बघण्याकरीता सुट्टीचे दिवस वगळता आमच्या कार्यालयात संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत उपलब्ध आहेत. कोणताही निविदा/टेंडर स्विकारण्याचे व नाकारण्याचे अधिकार अशोका प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित श्रीबाग नं. ३, ता. अलिबाग यांचे व्यवस्थापन समिती राखुन ठेवत आहेत.

दिनांक

सही / -
सचिव

सही /-
चेअरमन

**अशोका प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित**
श्रीबाग नं. ३, ता. अलिबाग
संपर्क - ९४२२०९४१२१

## जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे तळवली, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड, येथील खाली वर्णन असलेली जमीन मिळकत यांनी विद्यामान मालक श्री सदानंद नामदेव वाघ यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

**मौजे तळवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| १० | ४/अ/१ | ०-३२-०० | ०.३० |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे साठेकरार, खरेदीखत, कुळखत्यार पत्र, बक्षीस पत्र, गहाण खत करारनामा अथवा इतर हक्क हितसंबंध अगर सदरील व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खलील सही करणारे यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत नोंदवावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल. व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक १६/०५/२०२४
येणेप्रमाणे जाहीर नोटीस

**ॲड. लक्ष्मी हे.पवार**
लक्ष्मी आयकॉन,१०९, सेक्टर २०,
सीबीडी बेलापुर नवी मुंबई ००६१४
मो.नं.९६६५१७७२०१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रमाकांत तुकाराम खांडेकर यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्यासंदभात बोलणी सुरू आहेत. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बामणोली ता. अलिबाग | ३२ | जिरायत ०-५२-०० पो.ख. ०-००-०० एकूण क्षेत्र ०-५२-०० | २.८९ |

दिनांक : १५/०५/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मो.बा. ९७६७०९०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकतींचे विद्यमान मालक श्रीमती रत्नप्रभा रत्नाकर पवार, रा. मु. किहिम, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडुन सदर मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी सुध्दा त्यांच्याबरोबर केली आहे

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार(रु. पै) |
|---|---|---|---|---|
| १ | किहिम तलाठीसजा किहिम ता. अलिबाग, जि. रायगड | २६६ | ०-६४-० पो.ख ०-०२-८० एकुण ०-६६-८० | ६-१२ |

वर नमुद मिळकतीचे एकूण क्षेत्रापैकी ०-१६-०० हे. आर. पॉ एवढे क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकतींबाबत कुणाचेही तांबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांचे आत खाली सही करणार याचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यांत, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजुन इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहेत, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १६/०५/२०२४

सही/-
**ॲड. निकेत रौ. चवरकर**
रोहिदास नगर रोड, त्रिवेणी कॉम्प्लेक्स,
पहिला मजला, रूम नं. ८, मु. चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९०४९४९२३८०

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत श्री. महेश काशिनाथ तवटे, राहणार २०४/२, कृष्ण विहार, स्वामी समर्थ नगर, स्वामी समर्थ मंदिरजवळ, पिंपळभाट, ता. अलिबाग, जि. रायगड, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकती वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सातिर्जे, ता. अलिबाग. | २७५/५ | ४-०५-०० एकूण | ४०-५० |

अलिबाग,
दिनांक : १५/०५/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म.भगत )**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

**निवडक**

## लामिछाची निर्दोष मुक्तता

**नेपाळ:** नेपाळ क्रिकेट संघाचा माजी कर्णधार संदीप लामिछाने याला पाटण उच्च न्यायालयाने क्लीन चिट दिली आहे. एका अल्पवयीन मुलीने स्टार क्रिकेटवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला होता आणि या लेग-स्पिनरला काठमांडू जिल्हा न्यायालयाने ८ वर्षांची शिक्षा सुनावली होती. पाटण उच्च न्यायालयाने बुधवारी संदीप लामिछाने याला 'निर्दोष' ठरवले. आता, तो आगामी ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठीच्या संघ निवडीसाठी उपलब्ध आहे.

## फ्लेमिंग भारताचे प्रशिक्षक?

**मुंबई :** बीसीसीआय सध्या पुरूष क्रिकेट संघासाठी नव्या प्रशिक्षकाच्या शोधात आहे, यासाठी बोर्डाने अर्जही मागवले आहेत. पण या दरम्यानचं बीसीसीआय न्यूझीलंड संघाचा माजी खेळाडू स्टीफन फ्लेमिंग यांच्या नावाचा विचार करत आहेत.अटींप्रमाणे नवे मुख्य प्रशिक्षक हे भारताच्या तिन्ही फॉरमॅटमधील संघाला प्रशिक्षण देतील. वर्षातून १० महिने संघासोबत राहणे आवश्यक असलेल्या या पदासाठी फ्लेमिंग खरोखरच अर्ज करतात का, हे पाहणे उत्सुकतेचे असेल.

## बाबर केली बोलती बंद

**नवी दिल्ली :** पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम टी २० विश्वचषकापूर्वी चांगल्याच फॉर्ममध्ये दिसत आहे. तो आयर्लंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांच्या टी २० मालिकेत मोहम्मद रिझवानसोबत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज राहिला. या दोघांनीही मालिकेत १३२-१३२ धावा ठोकल्या. आता पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमनं मालिकेतील तिसऱ्या सामन्यात एका षटकामध्ये चार षटकार मारून सर्व टीकाकारांची बोलती बंद केली आहे.

## रियानच्या कामगिरीकडे लक्ष

**गुवाहाटी :** अव्वल दोन संघांतील स्थान निश्चित करण्यासाठी उत्सुक असलेल्या राजस्थान रॉयल्ससमोर बुधवारी पंजाब किंग्जचे आव्हान असेल. गुवाहाटी येथे होणाऱ्या या सामन्यात राजस्थान संघाचा फलंदाज रियान परागच्या कामगिरीकडे चाहत्यांचे लक्ष राहील. रियान मूळचा आसामचा आहे. राजस्थानचा संघ सध्या १६ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी आहे. त्यांनी उर्वरित दोनही सामने जिंकल्यास त्यांचे अव्वल दोनमधील स्थान निश्चित होईल.

## द. आफ्रिकेचा भारत दौरा

**मुंबई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भारत आणि दक्षिण आफ्रिका मालिकेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. पुढच्या महिन्यात दक्षिण आफ्रिकेचा महिला संघ भारत दौऱ्यावर येणार असून, इथे ३ वन डे, १ कसोटी आणि ३ ट्वेंटी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. या मालिका बंगळुरू आणि चेन्नई या शहरांमध्ये पार पडतील. १३ जून रोजी एक सराव सामना खेळवला जाईल, तर २८ जून ते १ जुलै या कालावधीत ४ दिवसीय कसोटी सामना होईल.

# भारताची वाढणार डोकेदुखी

### सामन्याची वेळ ठरणार अडचण; आयसीसीच्या नियमामुळे गोंधळ




। अमेरिका । वृत्तसंस्था ।

अमेरिका आणि वेस्ट इंडिज येथे होणाऱ्या ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धा सुरू होण्यास आता अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. क्रिकेटच्या रणसंग्रामासाठी सारे संघ उत्सुक आहेत. २० संघांची प्रत्येकी ५ अशा चार गटांत विभागणी केली गेली आहे आणि प्रत्येक गटातून अव्वल दोन असे ८ संघ सुपर ८ मध्ये खेळणार आहे. अ गटात भारत, पाकिस्तान, आयर्लंड, कॅनडा, अमेरिका असे संघ आहे आणि या गटातून भारत व पाकिस्तान यांचा सुपर ८ मध्ये प्रवेश पक्का समजला जात आहे. भारतीय संघाचे सर्व सामने भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता खेळवण्यात येणार आहेत आणि हिच गोष्ट आता भारताची डोकेदुखी वाढवणारी ठरू शकते.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आणि क्रिकेट वेस्ट इंडिज यांनी विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य फेरीसाठी राखीव दिवस नसल्याचे स्पष्ट केले आहे. उपांत्य फेरीचा दुसरा सामना भारतीय संघाच्या हिताच्या दृष्टीने रात्री ८ वाजता आयोजित केला गेला आहे. जर भारतीय संघ उपांत्य

**पहिली उपांत्य फेरीचा सामना २६ जूनला त्रिनिदाद येथे तेथील स्थानिक वेळेनुसार रात्री ८.३० वाजल्यापासून सुरू होईल. या सामन्याला राखीव दिवस आहे आणि त्यामुळे पावसाचा व्यत्यय आल्यास २७ जूनला मॅच खेळवली जाईल.**

**चारही संघांना एक सामना पूर्ण करण्याची समान संधी आहे. संघांना सलग दिवस खेळणे, प्रवास करणे, खेळणे असे करावे लागणार नाही याची खात्री करण्यासाठी, दुसऱ्या उपांत्य सामन्यासाठी अतिरिक्त वेळ दिला गेला आहे.**

फेरीसाठी पात्र ठरल्यास त्यांना २७ जूनला खेळावे लागेल. या सामन्यात पावसाची शक्यता आहे आणि राखीव दिवसही ठेवला गेलेला नाही. अशा परिस्थिती भारताची डोकेदुखी वाढू शकते. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी राखीव दिवस नाही, परंतु अतिरिक्त २५० मिनिटे म्हणजेच ४ तास १० मिनिटांचा कालावधी दिला गेला आहे. त्यामुळे हा सामना त्याच दिवशी संपवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सामन्यासाठी अतिरिक्त चार तास देण्यात आले आहेत जेणेकरून संघाला सलग दिवस खेळावे लागणार नाही, प्रवास करावा लागणार नाही आणि नंतर खेळावे लागणार नाही. पहिली सेमी फायनल २६ जूनला त्रिनिदाद येथे तेथील स्थानिक वेळेनुसार रात्री ८.३० वाजल्यापासून सुरू होईल. या सामन्याला राखीव दिवस आहे आणि त्यामुळे पावसाचा व्यत्यय आल्यास २७ जूनला मॅच खेळवली जाईल. दुसरा उपांत्य फेरीचा सामना गयाना येथे होईल आणि तेथील परिस्थिती वेगळी आहे. हा सामना स्थानिक वेळेनुसार सकाळी १०.३० वाजता (भारतीय वेळ ८.३०) सुरू होईल आणि पावसाचा व्यत्यय आल्यानंतरही अतिरिक्त २५० मिनिटांत त्याच दिवशी संपवला जाईल. त्यामुळे पंचांना हा सामना पूर्ण करण्यासाठी ८ तास वाट पाहावी लागेली. २८ जून हा प्रवासाचा दिवस आहे आणि २९ जूनला अंतिम सामना होणार आहे. चारही संघांना एक सामना पूर्ण करण्याची समान संधी आहे. संघांना सलग दिवस खेळणे, प्रवास करणे, खेळणे असे करावे लागणार नाही याची खात्री करण्यासाठी, दुसऱ्या उपांत्य सामन्यासाठी अतिरिक्त वेळ दिला गेला आहे.

पहिला उपांत्य सामना संध्याकाळचा आहे, याचा अर्थ त्याच दिवशी सर्व अतिरिक्त वेळ देणे शक्य नाही असे सूत्राने सांगितले. वेळापत्रकानुसार भारतीय संघ गयाना येथे होणारा उपांत्य फेरीचा सामना खेळण्याची शक्यता आहे. जर अतिरिक्त वेळेतही सामना पूर्ण न झाल्यास सुपर ८ मधील संघाच्या कामगिरीवर अंतिम सामन्यातील संघ ठरवला जाईल.

## सात्विकसाई आणि चिराग थायलंड ओपन स्पर्धेत भारताचे नेतृत्व करणार



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

सात्विकसाई रँकिरेड्डी आणि चिराग शेट्टी ही स्टार पुरुष दुहेरी जोडी मंगळवारपासून थायलंड ओपन सुपर ५०० स्पर्धेत भारतीय आव्हानाचे नेतृत्व करेल.पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरलेल्या खेळाडूंनी त्यांच्या कौशल्यांचा सन्मान करण्यासाठी काम केले आहे. सात्विक आणि चिराग ही जोडी मलेशियाच्या नूर मोहम्मद अझरिन, अयुब अझरिन आणि टॅन वेई किओंग या मलेशियन जोडीविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल.जागतिक चॅम्पियनशिप आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेता भारताचा अव्वल एकेरी खेळाडू प्रणॉयला सध्याच्या हंगामात जवळचे सामने जिंकण्याची गरज आहे.जॉर्ज आणि सतीश कुमार करुणाकरन हे देखील एकेरी गटात आव्हानात्मक आहेत, तर लक्ष्य सेन आणि पीव्ही सिंधू यांनी गेल्या आठवड्यात स्पर्धेचा ड्रॉ जाहीर होण्यापूर्वी स्पर्धेतून माघार घेतली.

## सचिन तेंडुलकरच्या बॉडीगार्डने संपवलं जीवन




। जळगाव । वृत्तसंस्था ।

माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरकडे अंगरक्षक म्हणून काम करणाऱ्या एका एसआरपीएफ जवानाने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.प्रकाश कापडे असं आत्महत्या केलेल्या जवानाचं नाव आहे. त्यांचं वय ३७ वर्षे इतकं होतं. मागच्या काही दिवसांपासून ते सचिन तेंडुलकर यांच्याकडे बॉडीगार्ड म्हणून कामकत होते. बुधवारी पहाटे त्यांनी आत्महत्या केली.प्रकाश यांच्या आत्महत्येचे कारण समजू शकलेले नाही. सचिन तेंडुलकर यांच्यापूर्वी त्यांनी मंत्री छगन भुजबळ, नारायण राणे यांच्याकडेही काम केलेलं होतं. प्रकाश कापडे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुले, बहीण, भाऊ असा परिवार आहे.

प्रकाश कापडे हे मागच्या काही दिवसांपासून जळगावमध्ये आले होते. त्यांच्या आत्महत्येची बातमी वाऱ्यासारखी परिसरात पोहोचली आणि लोकांनी त्यांच्या घराजवळ गर्दी केली. त्यानंतर पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते.त्यांनी राहत्या घरी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. प्रकाश कापडे हे मध्ये भरती झाले होते. सध्या त्यांची पोस्टिंग मुंबई येथे सचिन तेंडुलकर यांचे बॉडी गार्ड म्हणून होती.रात्रीच्या सुमारास प्रकाश कापडे यांनी राहत्या घरी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याची माहिती मिळताच जामनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांना मिळाली. त्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन त्यांचा मृतदेह शवविच्छेदनसाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केला आहे.

## गोल्डन बॉल ट्रॉफी गेली चोरीला

### उत्तराधिकाऱ्यांनी दिली माहिती



। पॅरिस । वृत्तसंस्था ।

महान फुटबॉलपटू डिएगो मॅराडोना यांच्या १९८६ सालच्या फिफा विश्वचषक स्पर्धेतील गोल्डन बॉल ट्रॉफीचा पुढील महिन्यात लिलाव होणार होता. मात्र, ही ट्रॉफी चोरीला गेली असून, हा लिलाव रोखण्यासाठी गुन्हा दाखल करणार असल्याचे मॅराडोनाच्या उत्तराधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांच्या वकिलांनी मंगळवारी याबाबत माहिती दिली. फिफा विश्वचषक स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूला गोल्डन बॉल ट्रॉफी प्रदान केली जाते. मॅराडोना यांना मिळालेली ही ट्रॉफी सुमारे दशकभर गायब होती आणि नुकतीच ती पुन्हा सर्वांसमोर आली होती. अगुटेस ऑक्शन हाउसने गेल्याच आठवड्यात या ट्रॉफीचा पुढील महिन्यात लिलाव होणार असल्याचे जाहीर केले होते. २०२० मध्ये मॅराडोना यांचे वयाच्या ६०व्या वर्षी निधन झाले होते.

## गौरव, मोनिका, मनीषाचे पदक पक्के

। अस्ताना । वृत्तसंस्था ।

भारताच्या तीन खेळाडूंनी एलोंडा बॉक्सिंग करंडकात दमदार कामगिरी करीत तीन पदके पक्की केली. कझाकस्तान येथील अस्ताना येथे ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा सुरू आहे. गौरव चौहान, मनीषा व मोनिका यांनी उपांत्य फेरीत प्रवेश करून भारतासाठी मोलाची कामगिरी बजावली.गौरव चौहान याने ९२पेक्षा जास्त किलो वजनी गटात कझाकस्तानच्या डॅनियल सपारबाय याच्यावर ३-२ असा संघर्षमय विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

## बीसीसीआय सेहवाग, गंभीरला डावलणार?



**मुख्य प्रशिक्षक पदासाठी व्हीव्हीएस लक्ष्मण देखील इच्छुक**

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघाला १ जुलैपासून नवीन प्रशिक्षक मिळणार आहे. त्याची शोधाशोध बीसीसीआयने सुरु केली असून २७ मे पर्यंत अर्जही मागविले आहेत. यासाठी काही अटीदेखील ठेवण्यात आल्या आहेत. म्हणजेच राहुल द्रविडला पुन्हा मुदतवाढ दिली जाणार नाही. अशातच नव्या कोचसाठी नावांच्या चर्चा सुरु झाल्या असून बीसीसीआय परदेशी प्रशिक्षक नेमते की भारतीय असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे.

भारती संघ आणि परदेशी कोच आणि वाद ही समीकरणे काही नवीन नाहीत. अशातच बीसीसीआयने परदेशी प्रशिक्षकासाठी माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटर टॉम मूडी आणि न्यूझीलंडचा माजी कप्तान स्टीफन फ्लेमिंग सह अन्य खेळाडूंशी चर्चा केली आहे. अशातच भारतातून गौतम गंभीर आणि विरेंद्र सहवाग हे आक्रमक खेळाडू देखील इच्छुक असल्याचे समजते आहे. नाव न छापण्याच्या अटीवर बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्राने ही माहिती दिली आहे. भारतीय खेळाडूंमध्ये व्हीव्हीएस लक्ष्मणचे देखील नाव चर्चेत आहे. तसेच माजी ऑस्ट्रेलियन खेळाडू जस्टिन लैंगरचे देखील नाव आहे. बीसीसीआय यावेळी परदेशी प्रशिक्षकावर डाव खेळण्याची शक्यता या सूत्राने वर्तविली आहे. यामध्ये फ्लेमिंगची दावेदारी प्रबळ समजली जात आहे.

## काळानुरूप बदलणे गरजेचे!

### प्रभावी खेळाडूच्या नियमाला शास्त्री, अश्विन यांच्याकडून समर्थन

। चेन्नई । वृत्तसंस्था ।

आयपीएल क्रिकेटमध्ये वापरण्यात येणाऱ्या प्रभावी खेळाडूच्या नियमावर भारताचा कर्णधार रोहित शर्मासह अन्य काही आजी-माजी खेळाडूंनी टीका केली असली, तरी रोहितचा संघ-सहकारी रविचंद्रन अश्विन आणि भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी या नियमाचे समर्थन केले आहे. काळानुरूप बदलणे गरजेचे आहे, असे शास्त्री म्हणाले.

जेव्हा एखाद्या नव्या नियमाचा अवलंब केला जातो, तेव्हा काही लोकांकडून त्याला विरोध होतोच. नवा नियम कसा चुकीचा आहे हे त्यांच्याकडून दाखवले जाते. मात्र, ज्या वेळी १९०-२०० ची धावसंख्या सातत्याने पाहायला मिळते, खेळाडूंना अधिक संधी उपलब्ध होते आणि ते या संधीचे सोने करतात, तेव्हा लोक नियमाबाबत वेगळ्या दृष्टिकोनातून विचार करण्यास सुरुवात करतात. प्रभावी खेळाडूचा नियम चांगलाच आहे. तुम्ही काळानुरूप बदलणे गरजेचे असते. अन्य खेळांमध्येही हे घडते. तुम्ही नवे नियम, बदल स्वीकारायला हवेत. प्रभावी खेळाडूच्या नियमामुळे सामने अधिक चुरशीचे होत आहेत,असे मत शास्त्री यांनी व्यक्त केले.

या नियमानुसार, मैदानात खेळणाऱ्या ११ खेळाडूंव्यतिरिक्त आणखी पाच खेळाडू राखीव म्हणून निवडण्याची संघांना मुभा असते. त्यानंतरसामन्याच्यापरिस्थितीनुसार, संघांना ११ जणांमधील एका खेळाडूच्या जागी राखीवमधील एका खेळाडूला ङ्गप्रभावी खेळाडूफ म्हणून उर्वरित सामन्यात खेळवता येते. त्यामुळे प्रथम फलंदाजी करणारे संघ नंतर गोलंदाजीच्या वेळी एका फलंदाजाला बाहेर करून अतिरिक्त गोलंदाजाला संघात स्थान देतात. मात्र, या नियमामुळे भारतीय अष्टपैलूंच्या प्रगतीला खीळ बसत असल्याचे रोहित काही दिवसांपूर्वी म्हणाला होता. परंतु त्याचा भारतीय संघातील सहकारी अश्विनने थोडे वेगळे मत व्यक्त केले.

प्रभावी खेळाडूच्या नियमामुळे भारतीय खेळाडूंना अधिक संधी मिळत असल्याचे अश्विन म्हणाला. यासाठी त्याने यष्टिरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलचे उदाहरण दिले. आयपीएलच्या गेल्या हंगामात प्रभावी खेळाडूचा नियम पहिल्यांदा वापरण्यात आला होता. त्यावेळी राजस्थान रॉयल्स संघाने बहुतांश सामन्यांत जुरेलला प्रभावी खेळाडू म्हणून खेळवले होते. या संधीचा पुरेपूर वापर करताना जुरेलने सर्वांना प्रभावित केले.

## पृथ्वीची आयपीएल कारकीर्द धोक्यात?

। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।

भारताचा युवा फलंदाज पृथ्वी शॉला ८ सामने खेळण्याची संधी मिळाली आणि त्यात त्याने १९८ धावा केल्या. पृथ्वीचा एकंदर खेळ पाहता पुढील पर्वासाठी त्याला संघात कायम राखण्याची शक्यता कमीच आहे. पृथ्वीच्या जागी संधी मिळालेल्या अभिषेक पोरेलने आपले नाणे खणखणीत वाजवले आणि १४ सामन्यांत ३२७ धावा केल्या. त्यामुळे संघ पृथ्वीपेक्षा अभिषेकवर जास्त विश्वास दाखवत आहेत.

## मनिकाची रॅंकिंगमध्ये झेप




। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

अव्वल महिला टेबल टेनिसपटू मनिका बत्राने सौदी स्मॅशमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्यानंतर कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट एकेरी रँकिंग २४ वर पोहोचली आणि जागतिक क्रमवारीत अव्वल २५ मध्ये स्थान मिळवणारी ती पहिली भारतीय महिला टेबल टेनिस खेळाडू ठरली.२८ वर्षीय खेलरत्न पुरस्कार विजेती मनिका, जी स्पर्धेपूर्वी ३९ व्या क्रमांकावर होती, तिने जेद्दाह येथे उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आणि तिच्या कामगिरीने १५ स्थानांनी झेप घेतली.

२०१८ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत वैयक्तिक आणि सांघिक प्रकारात सुवर्णपदक विजेती मनिका हिने सौदी स्मॅशमध्ये अंतिम आठच्या प्रवासादरम्यान अनेक वेळा विश्वविजेता आणि ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती चीनच्या वांग मन्यु हिचा पराभव केला. या कामगिरीसाठी मनिकाला ३५० गुण मिळाले.ती म्हणाली करिअरमधील सर्वोत्कृष्ट रँकिंग आणि ऑलिम्पिक स्पर्धे पूर्वी अव्वल २५ मध्ये पोहोचल्याने माझ्या तयारीला चालना मिळेल. मला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ही कामगिरी सुरू ठेवायची आहे आणि क्रमवारीत पुढे जाणे मला आवडेल. सुधारणा ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे आणि त्यासाठी मी वचनबद्ध आहे.मनिकाने तिचे प्रशिक्षक अमन बालागु आणि बेलारूसचे प्रशिक्षण भागीदार किरिल बाराबानोव्ह यांना एका इंस्टाग्राम पोस्टमध्ये तिच्या यशाबद्दल आभार मानले.

## मनू, विजयवीरचा अचूक निशाणा

### पॅरिस ऑलिंपिक निवड चाचणीत यश



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

मनू भाकेर व विजयवीर सिद्धू या दोन नेमबाजांनी पॅरिस ऑलिंपिकसाठीच्या निवड चाचणीत यश मिळवले. मनू हिने महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात ४२ गुणांसह पहिल्या स्थानावर झेप घेतली. मनूने याप्रसंगी विक्रमी गुणसंख्या मिळवली. विजयवीर याने पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारात ३४ गुणांसह पहिल्या स्थानावर झेप घेतली. ऑलिंपिक पात्रतेसाठी ही अखेरची स्पर्धा होती. आता उद्यापासून ५० मीटर रायफल थ्री पोझिशन या प्रकारच्या पात्रता फेरींना सुरुवात होणार आहे.मनू भाकेर हिने महिलांची २५ मीटर पिस्तूल प्रकारच्या चारही पात्रता फेरी गाजवल्या. तिने दोन पात्रता फेरींमध्ये पहिले स्थान पटकावले. तसेच इतर दोन पात्रता फेरींमध्ये तिने दुसरा क्रमांक मिळवला. तसेच निवडण्यात आलेल्या पाच महिला नेमबाजांमध्ये ती एकुलती एक अशी नेमबाज आहे की, पात्रता प्राथमिक फेरीत ५८० गुणांपेक्षा कमी गुण मिळवलेले नाही. मनू हिने चारही प्राथमिक फेरीत ५८० पेक्षा जास्त गुणांची कमाई केली आहे. त्यामुळे पॅरिस ऑलिंपिकमधील तिचा प्रवेश नक्की समजला जात आहे.अभिज्ञा पाटीलचा दुसरा क्रमांकमनू भाकेर हिने पहिला क्रमांक मिळवला. त्याच २५ मीटर पिस्तूल प्रकारात अभिज्ञा पाटील हिने ३५ गुणांसह दुसरा क्रमांक मिळवला. सिमरनप्रीत कौर ३० गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिली. इशा सिंग व रिदम सांगवान यांनी अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक मिळवला.

### पुरुषांमध्ये रस्सीखेच

**महिलांमध्ये मनू भाकेर व इशा सिंग यांनी अप्रतिम कामगिरी करीत जवळपास आपले तिकीट बुक केले आहे; पण पुरुषांमध्ये रस्सीखेच दिसून येत आहे. अनिश याने पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारातील दोन पात्रता फेरी जिंकल्या असून इतर दोन पात्रता फेऱ्यांमध्ये तो दुसऱ्या स्थानावर राहिला आहे. भावेश शेखावत याने एक पात्रता फेरी जिंकली आहे. विजयवीर याने शेवटच्या पात्रता फेरीत विजय मिळवला असून इतर दोन पात्रता फेरींमध्ये तो दुसऱ्या स्थानी आहे.**

## दीक्षाकडून नवीन राष्ट्रीय विक्रम




**लॉस एंजिलिस स्पर्धा, महिलांच्या १५०० मीटर शर्यतीत यश**

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताची महिला खेळाडू के. एम. दीक्षा हिने लॉस एंजिलिस येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये नव्या राष्ट्रीय विक्रमावर मोहोर उमटवली. तिने महिलांची १५०० मीटर धावण्याची शर्यत ४.०४.७८ अशी वेळ देत पूर्ण केली आणि नवा विक्रम प्रस्थापित केला.

ही स्पर्धा जागतिक ॲथलेटिक्स उपखंडीय ब्राँझ लेव्हल म्हणून ओळखली जात आहे..२५ वर्षीय के. एम. दीक्षा हिने १५०० मीटर धावण्याच्या शर्यतीत तिसरा क्रमांक पटकावला. याआधी हरमिलन बेन्स हिने २०२१मध्ये पार पडलेल्या राष्ट्रीय ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेमध्ये ४.०५.३९ अशी वेळ देत पहिल्या क्रमांकाला गवसणी घातली होती.दीक्षाकडून हा विक्रम मोडला गेला. याआधी दीक्षाने २०२३मध्ये कलिंगा येथे झालेल्या राष्ट्रीय आंतरराज्य स्पर्धेमध्ये ४.०६.०७ अशा वेळेसह शर्यत पूर्ण केली होती. ही तिची सर्वोत्तम कामगिरी होती.

### पारूलकडून निराशा

**पारूल चौधरी हिने महिलांच्या पाच हजार मीटर शर्यतीत पाचवा क्रमांक मिळवला. तिला स्वत:चा राष्ट्रीय विक्रम मोडता आला नाही. तिने १५.१०.६९ अशा वेळेसह शर्यत पूर्ण केली. अंकित हिला १५.२८.८८ अशा वेळेसह दहाव्या स्थानावर समाधान मानावे लागले.**

### अविनाश साबळे दुसरा

**अविनाश साबळे याने पुरुषांची पाच हजार मीटर धावण्याची शर्यत १३.२०.३० अशा वेळेसह पूर्ण केली व दुसरा क्रमांक मिळवला; त्याने पाच हजार मीटर धावण्याची शर्यत पूर्ण करीत राष्ट्रीय विक्रम नोंदवला होता.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)